## मा.व्यवस्थापक समिती सभेचे
### प्रतिवृत्त पुस्तक

दिनांक 30.८.९९ पासून दिनांक ____________

ठराव नोंदवही आर्टिकल - ब

# मा. व्यवस्थापक समिती सभा.

| अ.क्र. | दिनांक | पाननंबर | अ.क्र. | दिनांक | पाननंबर |
|---|---|---|---|---|---|
| ५. | 30.0६.१९९९ | २ | ११. | २६.02.2002 | १८८ |
| ६. | 30.0९.१९९९ | ६ | १२. | 30.03.2002 | १९0 |
| ७. | 30.१0.१९९९ | ११ | 2002-2003 | | |
| ८. | २९.११.१९९९ | १५ | १. | | |
| ९. | 30.१२.१९९९ | 23 | २. | | |
| १0. | २८.0१.2000 | 33 | ३. | | |
| ११. | २६.02.2000 | ४२ | ४. | | |
| १२. | २५.03.2000 | ४९ | ५. | | |
| 2000-01 | | | ६. | | |
| १. | २९.0४.2000 | ५७ | ७. | | |
| २. | २९.0५.2000 | ६५ | ८. | | |
| ३. | १0.0६.2000 | ७२ | ९. | | |
| ४. | १0.0७.2000 | ७५ | १0. | | |
| ५. | २२.0८.2000 | ८0 | | | |
| ६. | १८.0९.2000 | ८७ | | | |
| ७. | २५.१0.2000 | ९८ | | | |
| ८. | १४.११.2000 | १0१ | | | |
| ९ | २८.१२.2000 | १0५ | | | |
| १0. | १७.0१.2001 | ११0 | | | |
| ११. | २४.02.2001 | ११३ | | | |
| १२. | २४.03.2001 | ११८ | | | |
| 2001-2002 | | | | | |
| १ | २८.0४.2001 | १२४ | | | |
| २. | २८.0५.2001 | १३0 | | | |
| 3 | 30.0६.2001 | १33 | | | |
| ४ | 30.0७.2001 | १४0 | | | |
| ५. | २४.0८.2001 | १४४ | | | |
| ६. | २४.0९.2001 | १५0 | | | |
| ७. | २९.१0.2001 | १५७ | | | |
| ८. | २८.११.2001 | १६१ | | | |
| ९. | २४.१२.2001 | १६५ | | | |
| १0. | ३१.0१.2002 | १७0 | | | |

This is to certify that this Register contains 400 pages.

Manager (Officiating)
N. D. C. C. Bank Ltd.
Ruikar Road, Gandhisagar,
NAGPUR.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा सोमवार दिनांक ३०.८.१९९९ रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेचे मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेच्या उपाध्यक्षा मा. सौ. आशाताई महाजन यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.

या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

| | | |
|---|---|---|
| १. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्ष तथा सभाध्यक्ष |
| २. | मा. श्री. भा. चं. शहाणे | सदस्य |
| ३. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ४. | मा. श्री. शा. गा. धवड | " |
| ५. | मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| ६. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| ७. | मा. सौ. कु. ग. किंमतकर | सदस्या |
| ८. | मा. श्री. आर. एम. खुसारी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर. | |
| ९. | मा. श्री. ए. एन. चौधरी, | सरव्यवस्थापक. |

अनुपस्थित

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. र. गो. बंग | सदस्य |
| ३. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |
| ४. | मा. श्री. व. क. पारशिवनिकर | " |
| ५. | मा. श्री. एम. के. शेंडे, विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक) नागपूर. | |
| ६. | मा. विभागिय अधिकारी, महा. राज्य सह. बँक मर्या. विभा. कार्या. नागपूर. | |

सभेला सुरुवात करण्यापूर्वी समितीचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार, समितीचे सदस्य मा. श्री. र. गो. बंग, मा. श्री. ब. भा. तायवाडे, मा. श्री. व. क. पारशिवनिकर यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर उपस्थितांचे स्वागत करुन मा. सभाध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ – मागील दिनांक ३१.७.१९९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. सभाध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व

विषयाचे अनुषंगाने सभेत चर्चेचे वेळी बँकेने वाटप केलेल्या लाभांश चे बाबतीत वर्ष, आमसभेची तारीख, मंजूर झालेला लाभांश पैकी वाटप, वाटपापैकी परत आलेला व त्यामुळे वाटप न झालेला, वाटपापैकी उचल केलेला परंतु रिकंसीलेशन मध्ये अडकून राहिल्याने जमाखर्ची न पडलेला, शिल्लक लाभांश इत्यादि तपशिलवार माहिती सभेला देण्यांत आली. शिल्लक लाभांश रक्कम परिपत्रकाप्रमाणे रिझर्व फंडाला जमा करावी अशी मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी सुचना केली. तरीपण शिल्लक लाभांशचे रकमे बाबतीत मार्गदर्शन मागविणेकरिता मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी असे सभेचे मत पडले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक ३१.८.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत सर्वानुमते कायम करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ : मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ : मा० सभाध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा० सरव्यवस्थापक यांनी दिनांक ३१.८.१९९९ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयाने कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ : बँकेचे माहे जुलै ९९ मध्ये आलेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ : मा० सभाध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने चर्चेचे वेळी मा० श्री शाहिर यांनी इतर किरकोळ खर्चा बाबत खुलासा करण्यास सांगितले असता मा० प्र० व्यवस्थापक यांनी कि सदर खर्चात डिसेंबर १९९८ मध्ये आलेल्या मा० संचालक मंडळाचे निवडणूकीच्या खर्च समाविष्ट असल्याचे सांगून इतर किरकोळ खर्चाबाबत सभेला तपशिलवार माहिती दिली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या माहे जुलै ९९चे व्यवस्थापन खर्चास मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ४ : माहे जुलै ९९ चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला औद्योगिच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ : मा० सभाध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला विषयाचे अनुषंगाने मा० सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती दिली. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या दिनांक ३०.७.१९९९ चे ताळेबंद पत्रक तसेच रोखनिधी व तरला औद्योगिच्या परिस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली.

विषय क्रमांक ५ : मा० सभाध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ५(१) : शाखा महाल येथील चालू असलेल्या कामाचे वर्क ऑर्डर अतिरिक्त जादा कामाचे एस्टीमेट मंजुरीबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ५(१) : मा० सभाध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणी सभेला माहिती देतांना सांगितले की, विभागीय सहकारी बोर्ड, नागपूर यांचे जागेत महाल शाखा असून सदर जागेत काउंटर व फर्निसिंग सिव्हील वर्क इत्यादि बत्रमे मे प्रीती बिल्डर्स कडून करून घेणेकरिता मा० अध्यक्ष यांनी महाल शाखेचे वरील प्रमाणे काम करण्यास रुपये २५०००/- ला मंजूरी दिलेली आहे. मा० अध्यक्ष व प्रभारी व्यवस्थापक यांचे महाल शाखेचे भेटीनंतर स्ट्रांग रूम व रेकार्ड रूम बनविण्याकरिता दिलेल्या सुचनेनुसार जादा कामाचे एस्टीमेट आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचेकडून मागविण्यात आले. सदर जादा कामाचे एस्टीमेट खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| जादा कामाचे एस्टीमेट ५% चढउतार निधिसह | रु. २६९८०.०० |
| ४% आर्कीटेक्ट फी - - - - | रु. १०७९.२२ |
| आर्कीटेक्ट फी वरील टॅक्स ५% - - | रु. ५३.९६ |
| एकूण | रु. २८२३८.८८ |
| टोकंदर रक्कम | रु. २८२५०/- |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन महाल शाखेचे जादा कामाचे एस्टीमेट रुपये २८२५०/- मंजूर करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(२) : हातमाग विणकर सहकारी संस्थांचे व्याज अनुदानाचे प्रकरणे मा० प्रादेशिक उपसंचालक हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग नागपूर यांचेकडे मंजूरीकरिता पाठविणेबाबत

ठराव क्रमांक ५(२) : हातमाग विणकर सहकारी संस्थांना बँकेनी

केलेल्या कर्जपुरवठ्यावर दिनांक १.४.९७ ते ३०.९.९७ व दिनांक १.१०.९७ ते ३१.३.९८ या कालावधीतील द.सा.द.शे. ४½ दराने व्याज अनुदान रक्कम अनुक्रमे रु. ५९८८११.७९ व रु. ६६२८२३.४६ असे एकूण रूपये १२६१७२३=२५ (अक्षरी रुपये बारा लाख एकसष्ठ हजार सातशे तेवीस आणि पैसे पंचेवीस फक्त) मंजूर करण्याबाबत मा. प्रादेशिक उपसंचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर यांचेकडे विनंती करण्यात येते. या विषयीच्या सर्व अटी व शर्ती मान्य करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५(३): बँकेचे सभासदत्व मिळण्यासाठी आलेल्या तुकडोजी कॅन्सर हॉस्पीटल कर्मचारी सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५(३): तुकडोजी कॅन्सर हॉस्पीटल कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. र.न. ७१४ संत तुकडोजी चौक, नागपूर, बँकेचे सभासदत्व मिळण्यासाठी बँकेकडे अर्ज आलेला आहे. अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रानुसार संस्थेच्या आर्थिक स्थितीची व ~~काम~~ कामकाजाची तपासणी, तपासणी विभागामार्फत करण्यांत आली असून या संस्थेचे आपल्या बँकेच्या हनुमाननगर शाखेत चालू ठेव खाते चालू असून ही संस्था कार्यरत असल्याचे दिसून आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन तुकडोजी कॅन्सर हॉस्पीटल कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. र.न. ७१४ कडून रूपये १०००/- शेअरची रक्कम व रुपये ५/- प्रवेश फी स्विकारून सभासदत्व मंजूर करण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून मा. सभाध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(signature) Asha Mahajan

सरव्यवस्थापक उपाध्यक्षा तथा सभाध्यक्षा.

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या, नागपूर.

बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा गुरुवार दि० ३०।९।९९ रोजी दुपारी २-०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयांतील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेच्या उपाध्यक्षा मा० सौ० आशाताई महाजन यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.

या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

— उपस्थित —

| | |
|---|---|
| १. मा० सौ० आशाताई महाजन | उपाध्यक्षा तथा सभाध्यक्षा. |
| २. मा० श्री. भा. चं. शहाणे. | सदस्य |
| ३. मा० श्री. व. भा. वांढे | " |
| ४. मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ५. मा० श्री. ब. भा. तायवाडे | " |
| ६. मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| ७. मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| ८. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर | " |
| ९. मा. सौ. कु. ग. किंमतकर | सदस्या |
| १०. मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

अनुपस्थित

| | |
|---|---|
| १. मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा. श्री र. गो. बंग | सदस्य |

३. मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.

४. मा० विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सह. संस्था (बँक) नागपूर.

५. मा० विभागीय अधिकारी, महा. राज्य सह. बँक, विभा. कार्या. नागपूर

सभेच्या सुरुवातीस सभेस अनुपस्थित असलेल्या माननीय श्री सुनील केदार, अध्यक्ष व मा. श्री र. गो. बंग, सदस्य यांची सभेसे अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

सभेला उपस्थितांचे स्वागत करुन विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात करण्यांत आली.

---

विषय क्रमांक १ – मागील दिनांक ३०.८.१९९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर

सविस्तर चर्चा होऊन ठराव क्र. ५ (२) मध्ये अनुक्रमे ५० संस्थांना रुपये ४६६२४९९१/- बाकीवर व ४४० संस्थांना रुपये ३००१६१३४/- बाकीवर" अशी दुरुस्ती घेण्यांत यावी असे ठरले. व मागील दिनांक ३०.८.१९९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले व माननीय सरव्यवस्थापक यांनी विषयाचे अनुषंगाने मागील दिनांक ३०.८.९९ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ३ - बँकेचे माहे ऑगस्ट १९९९ मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने चर्चेचे वेळी श्री शाहीर यांनी स्टेटमेंट मध्ये दाखविण्यात आलेल्या धान्यगंज शाखेचे किरायाबाबत माहिती विचारली असता धान्यगंज शाखेच्या ४ महिन्याच्या किराया दिला असल्याची सविस्तर माहिती दिली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या माहे ऑगस्ट ९९ चे व्यवस्थापन खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ४ - माहे ऑगस्ट ९९ चे ताळेबंद पत्रक व बँकेने राखलेला रोख निधी व तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ - मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा० सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती दिली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या दिनांक ३१.८.९९ चे ताळेबंद पत्रक तसेच रोख निधी व तरला

औद्योगिक परिस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ - मा० सभाध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ५(१) - बँकेचे मा० अध्यक्ष यांचे माहे जुलै ९९ मधील रुपये ७५५२/- चे प्रवास भत्ता बील मंजूर करणे.

ठराव क्रमांक ५(१) - बँकेचे अध्यक्ष मा० श्री. सुनील केदार यांचे माहे जुलै ९९ मध्ये मुंबई येथील सभेसाठी गेल्याबद्दल रुपये ७५५२/- प्रवास भत्ता बील सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५(२) - बँकेचे सभासदत्व मिळण्यासाठी आलेल्या सहकारी संस्थांच्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५(२) - मा० सभाध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, खाली दर्शविलेल्या सहकारी संस्थांचे अर्ज बँकेचे सभासदत्व मिळण्यासाठी आलेले आहे.

१. नागपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था म० नागपूर र.नं.४४
२. हायकोर्ट मिनिस्ट्रियल ऑफिसर्स को-ऑप क्रेसो० मर्या. नागपूर र.नं.८७५
३. महा० राज्य विज मंडळ कर्मचारी सह० पत संस्था मर्या. उमरेड जि. नागपूर. र.नं.११६२

बँकेचे तपासणी विभागामार्फत अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रानुसार संस्थेच्या आर्थिक स्थितीची व कामकाजाची तपासणी करण्यात आली असून ह्या संस्था कार्यरत असल्याचे दिसून आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त संस्थाकडून प्रत्येकी रुपये १०००/- शेअरची रक्कम व रुपये ५/- प्रवेश फी स्विकारुन सभासदत्व मंजूर करण्यात यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५(३) - श्री राम नेवले व त्यांचे सहकाऱ्यांनी बँकेविरुध्द काढलेल्या पत्रकाची व वर्तमान पत्रात प्रकाशित केलेल्या बातमीच्या अनुषंगाने बँकेच्या अब्रुनुकसानीबाबतचा दावा दाखल करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(३) - मा० सभाध्यक्ष यांनी विषयाचे अनुषंगाने सभेला

माहिती देतांना सांगितले की, श्री राम नेवले व त्यांच्या सहकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या जमा असलेल्या शेअर्सच्या रकमेपोटी "पांच वर्षाचे दुप्पट हिशोबाने शेअर्सची रक्कम परत करा" ह्या मथळ्याखाली पत्रके वाटून ३ ऑगस्ट ९९ रोजी बँकेच्या काटोल शाखेत मोर्चाचे आयोजन केले. तसेच लोकसत्ता ह्या दैनिक पत्रकांत दि. ९ ऑगस्ट १९९९ रोजी बँकेविरुध्द वृत्त प्रकाशित केले. शेतकऱ्यांचे शेअर्सच्या रकमा ह्या बँकेत कधीच जमा होत नसून संबंधीत सेवा सोसायटीकडे त्या रकमा जमा असतात. असे असतांना देखील त्यांनी हेतुपुरस्कर बँकेची बदनामी करण्याचा प्रयत्न करुन शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे श्री राम नेवले, ॲड. राजेंद्र बुंदे, रामदासजी नासरे, नारायनराव बोंद्रे व केशवराव गोंडे ह्यांना बँकेची अब्रुनुकसानीबाबत त्यांचेवर कायदेशीर कारवाई कां करण्यांत येवू नये त्याबाबत कायदेशिर नोटीस दिनांक २३.८.९९ ला पाठविण्यांत आला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री राम नेवले व त्यांचे सहकारी ॲड राजेंद्र बुंदे रामदासजी नासरे, नारायणराव बोंद्रे व केशवराव गोंडे यांचेवर बँकेमार्फत अब्रुनुकसानीचा दावा दाखल करण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५(४)- बँकेचे कर्मचाऱ्यांना दिवाळी पेशगी मंजूर करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(४)- मा. सभाध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी पेशगी मिळावी व ती दसऱ्यापूर्वी मिळावी म्हणून कर्मचारी युनियनने अर्ज केलेला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी पेशगी देण्यास बँकेचे मा. अध्यक्ष यांनी निर्णय घ्यावा असे सभेचे मत पडले. व बँकेचे कर्मचाऱ्यांना दिवाळी पेशगी देण्यास मंजूरीचे अधिकार बँकेचे मा. अध्यक्ष यांना देण्यात आले आहे. असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५(५) - बँकेचे पॅनेलवर चार्टर्ड अकाउंटंट घेणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(५) - मा. सभाध्यक्षा यांनी विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेकडे उद्योगाकरिता, प्रकल्पाकरिता रु.१०.०० लाखा पेक्षा जास्त कर्जमागणीचे अर्ज येत आहेत. अशा कर्ज मागणी अर्जासोबतचे प्रकल्प अहवालाची तांत्रिक दृष्ट्या तपासणी/छाननी होणे आवश्यक असल्याने श्री. पी. एस. ठाकरे, चार्टर्ड अकाऊंटंट, नागपूर यांनी बँकेचे पॅनेलवर काम करण्यास स्विकृती दिलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेकडे येणाऱ्या कर्जप्रकरणा सोबतचे प्रकल्प अहवालाची छाननी करून सक्षमता अजमाविणे व बँकेला योग्य तो अभिप्राय देणे याकरिता बँकेचे अधिकृत तांत्रिक सल्लागार म्हणून बँकेच्या पॅनेलवर श्री. पी. एस. ठाकरे, चार्टर्ड अकाऊंटंट यांची नेमणूक करण्यात यावी व प्रकल्पाची किंमत लक्षात घेऊन फी खालील प्रमाणे आकारण्यांत यावी असे ठरले.

| प्रकल्पाची किंमत. | - | आकारावयाची फी. |
|---|---|---|
| १. रूपये ५.०० लाखापर्यंत | - | रूपये १५००/- |
| २. रूपये ५.०० लाखावरील रूपये १०.०० लाखापर्यंत | - | रूपये २५००/- |
| 3. रूपये १०.०० लाखावरील रूपये १.०० कोटीपर्यंत | - | रूपये ६०००/- |
| ४. रूपये १.०० कोटीचे वरील | - | रूपये १२०००/- |

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर सभेपुढे कोणतेच विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून मा. सभाध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] [signature: Asha Mahajan]

सरव्यवस्थापक उपाध्यक्षा तथा सभाध्यक्षा

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा शनिवार दिनांक ३०.१०.१९९९ रोजी दुपारी १.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेचे अध्यक्ष माननीय श्री सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.

या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

— उपस्थित —

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. र. गो. बेग | सदस्य |
| ४. | मा. श्री. भा. चं. शहाणे | " |
| ५. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ६. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ७. | मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| ८. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| ९. | मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| १० | मा. सौ. कु. ग. किंमतकर | सदस्या |
| ११. | मा. श्री. आर. एम. भूसारी | जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर |
| १२. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

— अनुपस्थित —

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | सदस्य. |
| २ | मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सह. संस्था (बँक), नागपूर. | |
| ३. | मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक मर्या., विभा. कार्या. नागपूर | |

—

सभेला सुरुवात करण्यापूर्वी सभेला अनुपस्थित असलेले संचालक श्री. ब. भा. तायवाडे, सदस्य यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

सभेला उपस्थितांचे स्वागत करुन विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात करण्यांत आली.

विषय क्रमांक १ - मागील दिनांक ३०.९.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक ३०.९.९९ रोजीचे सभेतील

ठराव क्र० ५(५) मध्ये प्रकल्पाची किंमत लक्षात घेऊन आकारावयाचे फी बाबत खालिलप्रमाणे दुरुस्ती घेण्यांत यावी. असे ठरले. व मागील सभेचे प्रतीवृत्त सवनुमते कायम करण्यांत आले.

| प्रकल्पाची किंमत | आकारावयाची फी |
|---|---|
| रुपये ५.०० लाखापर्यंत | रुपये १०००/- |
| रुपये ५.०० लाखावरील व रु.१०.०० लाखापर्यंत | रुपये २०००/- |
| रुपये १०.०० लाखावरील व रु.१.०० कोटीपर्यंत | रुपये ५०००/- |
| रुपये १.०० कोटीचे वरील | रुपये १०,०००/- |

ठराव सवनुमते मंजूर

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मागील दिनांक ३०.९.९९ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मा० सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यात आली.

ठराव सवनुमते मंजूर.

विषय क्रमांक ३ - बँकेचे माहे सप्टेंबर १९९९ मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे सप्टेंबर १९९९ मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास सवनुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सवनुमते मंजूर

विषय क्रमांक ४ - बँकेचे माहे सप्टेंबर १९९९ चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेच्या तरली जींदगीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा० श्री. पाराशिवनीकर संचालक यांनी विचारलेल्या प्रश्नास उत्तर देतांना मा० सरव्यवस्थापक यांनी लाभांश देणे ही बाकी -

रिकंसिलिएशनच्या एंट्रीज डेबिट पडल्यामुळे मागीलपेक्षा यावेळी कमी दिसते आहे. असे सांगितले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन जुने लाभांश देण्याचे वेळी संबंधित शाखा व्यवस्थापक यांनी मुख्य कार्यालयाची मान्यता घेतल्या-शिवाय लाभांश देण्यांत येवू नये असे सभेचे मत पडले. आणि बँकेच्या दिनांक ३१.१.१९९९ चे ताळेबंद पत्रक तसेच रोख निधी व तरला जींदगीच्या परिस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ५(१) - बँकेच्या दैनंदिन कामकाजाकरिता लागणाऱ्या साहित्याचे छपाई करण्यास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ५(१) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या शाखांना दैनंदिन कामाकरिता लागणारे साहित्य व व्हावचर्स छपाई बँकेचे पॅनेल वरील खाली दर्शविलेल्या ३ प्रिंटर्स कडून घेणेकरिता रुपये१६३३०१.५० खर्च येणार आहे.

१. मे. गुरुकृपा प्रिंटर्स - २५ आयटम - रुपये ११५८२७.५०
२. मे. स्वस्तीक प्रिंटर्स - ३ आयटम - रुपये ४१७००.००
३. मे. हिरा प्रिंटींग प्रेस - ४ आयटम - रुपये ५७७४.००
एकूण रुपये - १६३३०१.५०

---

विषयावर सविस्तर चर्चा होऊन वरील तीन प्रींटर्स कडून बँकेस लागणारे बँकींग साहित्य व व्हावचर्स छपाई करून घेणे करिता रुपये १६३३०१.५० येणाऱ्या खर्चास मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(२) - बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी सहकारी संस्था कडून प्राप्त झालेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५(२) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दोन सहकारी संस्थानी बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी बँकेकडे अर्ज केले आहेत. ह्या संस्थांची तपासणी

बँकेचे तपासणी विभागामार्फत करण्यांत आली असून संस्था कार्यरत असल्याचे आढळून आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दोनपैकी एक प्रियदर्शनी महिला सहकारी संस्था मर्या. नागपूर र.नं. ६८० बाबत सविस्तर माहिती घेवून सभासदत्व मिळणे-साठी पुढील सभेत ठेवावी. आणि दुसरी फलोत्पादन व कृषि कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. नागपूर र.नं. ५६० ह्या संस्थेकडून रुपये १०००/- शेअरची रक्कम व रुपये ३/- प्रवेश फी स्विकारुन सभासदत्व मंजूर करण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(३) - बँकेचे मा॰ अध्यक्ष यांचे ऑक्टोबर १९९९चे प्रवास भत्ता बिल रुपये ७५४०/- मंजूर करणे.

ठराव क्रमांक ५(३) - बँकेचे अध्यक्ष मा॰ श्री सुनील केदार यांचे माहे ऑक्टोबर १९९९ मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य संगणकीकरण सहकारी सोसायटीचे संचालक मंडळाचे मुंबई येथील सभेचे रुपये ७५४०/- प्रवास भत्ता बील सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५(४) एकत्रित पगारमानावरील कर्मचाऱ्यांना दिवाळी पेशगी मंजूर करणे.

ठराव क्रमांक ५(४) - मा॰ अध्यक्ष यांनी सांगितले की, एकत्रित पगारमाना-वरील कर्मचाऱ्यांनी दिवाळी सणाकरिता पेशगी मिळणेसाठी अर्ज केला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेतील एकत्रित पगार मानावर असलेल्या कर्मचाऱ्यांना रुपये १५००/- दिवाळी सणाकरिता पेशगी देणेकरिता सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा॰ अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक          अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, नागपूर.

बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा सोमवार दिनांक २९.११.१९९९ रोजी दुपारी १-०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष माननीय श्री सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.

या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

— उपस्थित —

१. मा० श्री० सुनील केदार — अध्यक्ष
२. मा० सौ० आशाताई महाजन — उपाध्यक्षा
३. मा० श्री० र०गो० बंग — सदस्य
४. मा० श्री० भा० चं० शहाणे — "
५. मा० श्री० शा० ग० धवड — "
६. मा० श्री० ब० भा० तायवाडे — "
७. मा० श्री० ग० के० शाहीर — "
८. मा० श्री० चं० तु० समर्थ — "
९. मा० श्री० व० क० पारशिवनीकर — "
१०. मा० सौ० कु० ग० किंमतकर — सदस्या
११. मा० श्री० ए० एन० चौधरी — सरव्यवस्थापक

— अनुपस्थित —

१. मा० श्री० व० भा० वांढे — सदस्य
२. मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
३. मा० विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सह० संस्था (बँक), नागपूर.
४. मा० विभागीय अधिकारी, म० रा० सह० बँक मर्या० विभागीय कार्यालय, नागपूर

सभेला सुरुवात करण्यापूर्वी सभेला अनुपस्थित असलेले सदस्य मा० श्री० व० भा० वांढे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

सभेला उपस्थितांचे स्वागत करुन विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात करण्यांत आली.

विषय क्रमांक १ - मागील दिनांक ३०-१०-९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक ३०.१०.९९ च्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा० सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक ३०.१०.९९ चे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत सभेला माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ३ - माहे ऑक्टोबर १९९९ मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन स्टेटमेंट मधील इतर किरकोळ खर्च यांतील किरकोळ हा शब्द गाळण्यांत यावा. व 'इतर खर्च' असा शब्द ठेवावा. अशी दुरुस्ती स्टेटमेंट फार्म मध्ये दुरुस्ती सुचविण्यात आली. व माहे ऑक्टोबर १९९९ मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४ - गाडी क्रमांक ०८६ चे डेंटींग, पेंटींग, स्पेअरपार्टस् दुरुस्तीसह एकूण खर्च रुपये १४८५०/- चे पूर्व मंजूरी बाबत.

ठराव क्रमांक ४ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेची कार क्रमांक एम.एच ३१ एच-०८६ दिनांक १२.३.९५ ला खरेदी केली असून आतापर्यंत १५२००० कि.मी. फिरलेली आहे. गाडीचे पत्रे सडल्यामुळे व पेन्ट खराब झाल्यामुळे या गाडीचे डेंटींग पेंटींग करणे आवश्यक असल्याने या कामाकरिता अंदाजे रुपये १४८५०/- खर्च येईल. नविन गाडी खरेदी करायची झाल्यास त्यासाठी रु० ४.०० लाख अंदाजे खर्च येईल. यामुळे नविन गाडी खरेदी न करतां जुनीच गाडी दुरुस्त करून उपयोगात आणतां येईल असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन गाडीचे डेंन्टींग पेंटींग करिता येणाऱ्या अंदाजित रुपये १४८५०/- चा खर्च करण्यास मान्यता देण्यांत येत आली. याशिवाय याच गाडीसाठी मे० नागपूर टायर्स, नागपूर यांचे कोटेशन प्रमाणे जे० के० टायर कंपनीचे ४ नग टायर रुपये ७५२०/- किंमतीचे घेण्यास मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५ :- बँकेचे दिनांक ३०.९.१९९९ चे अर्धवार्षिक ताळेबंद पत्रकाची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या दिनांक ३०-९-१९९९ चे अर्धवार्षिक ताळेबंद पत्रकाची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६ - बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ६ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा होऊन प्रियदर्शनी महिला सहकारी संस्था म. नागपूर र.न. ६७० या संस्थेची सविस्तर माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे सदर संस्थेला सध्याच सभासदत्व न देता प्रकरण स्थगित ठेवण्यांत यावे व माहिती मागविण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७ - मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ७(१) - श्री राम नेवले व त्यांचे सहकाऱ्यांनी बँकेविरुध्द काढलेल्या पत्रकाची व वर्तमान पत्रांत प्रकाशित केलेल्या बातमीच्या अनुषंगाने त्यांचेवर दाखल करावयाच्या अब्रुनुकसानीच्या दाव्यात वकिलाची नियुक्ती तसेच दाव्याची रक्कम ठरविण्याबाबत...

ठराव क्रमांक ७(१) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा होऊन श्री राम नेवले व त्यांचे सहकारी यांनी बँकेविरुध्द काढलेल्या पत्रकाचे व वर्तमान पत्रांत प्रकाशित केलेल्या बातमीच्या अनुषंगाने रुपये ७,००,०००/- च्या अब्रुनुकसानीचा दावा दाखल करण्यांत यावा. व याकरिता लागणारी कोर्ट स्टँप फी रुपये ५६५५०/- भरण्यास मंजूरी देण्यांत आली. तसेच या प्रकरणी ॲड. व्ही. एम. सिरास यांची नियुक्ती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७(२) - शाखा सक्करदरा, शाखा महाल व शाखा धान्यगंज येथे लॉकर खरेदीच्या खर्चास मंजूरी देणेबाबत...

ठराव क्रमांक ८(२) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे सक्करदरा, धान्यगंज व महाल येथे ग्राहक/ठेवीदार यांचेकडून सततची होणारी मागणी लक्षात घेऊन शाखा व्यवस्थापकानी मुख्य कार्यालयास लॉकरची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. सततची होणारी मागणी लक्षांत घेता लॉकर पुरविण्याबाबत कोटेशन मागविण्यात आले आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सर्वात कमी दर असलेले मे. प्राचीत एन्टरप्रायझेस नागपूर यांचे कोटेशनप्रमाणे सर्वात कमी दर असलेले कब स्टील कंपनीचे लॉकर खरेदी करण्याकरिता व बसविण्याकरिता खालील प्रमाणे येणाऱ्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. असे ठरले.

| अ.क्र. | शाखेचे नांव | लॉकर खरेदीची किंमत | लॉकर बसविण्याचा खर्च | लॉकरचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १. | सक्करदरा शाखा | रु.८६३११/- | रु.२१००/- | नॉन डिफेंडर |
| २ | धान्यगंज शाखा | रु.१४९५५३/- | रु.६८००/- | डिफेंडर |
| ३. | महाल शाखा. | रु.८६३११/- | रु.२१००/- | नॉनडिफेंडर |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ८(३)(अ) - बँकेचे मुख्यकार्यालयातील इमारतीचे वरील माळ्यावर रेकार्ड रुम बांधण्याबाबत --

ठराव क्रमांक ८(३)(अ) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणि सभेला माहिती देतांना सांगितले की बँकेचे आमसभागृहांत रेकार्ड ठेवल्याने सभा घेण्याकरिता सभागृह नसल्याने बँकेचे मुख्य कार्यालय इमारतीचे वरचे माळ्यावर रेकार्डरुम बांधण्याकरिता श्री चिंचमलातपूरे आर्किटेक्ट यांचेकडून एस्टीमेट मागविण्यांत आले आहे. एस्टीमेट खालीलप्रमाणे आहे.

एकूण कामाचे एस्टीमेट ५% चढउतार निधीसह रु.५८७५६२.४२
६% आर्किटेक्ट फी रु. ३५४०२.५०
५% सर्व्हिस टॅक्स रु. १७७०.१२
एकूण रु. ६९२२८०.०३
एकूण एस्टीमेट रु. ६९२०००.००

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे मुख्यकार्यालयाचे इमारतीचे वरचे माळ्यावर रेकार्डरुम बांधणेकरिता श्री चिंचमलातपूरे आर्किटेक्ट यांनी दिलेल्या एस्टीमेटनुसार रुपये ६९२०००/-च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७(३)(ब) – बँकेचे संचालक व बँकेचे फिरतीवरील अधिकाऱ्यांना ब्रिफकेस देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७(३)(ब) – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होउन मा. संचालक, फिरतीवरील अधिकारी आणि बँकेचे मुख्याधिकारी यांचेसाठी मागविलेल्या कोटेशन प्रमाणे सॅम्पल मधून निवड केलेल्या ब्रिफकेसेस खरेदी करण्याकरिता येणाऱ्या रुपये ८८२०९/- एवढ्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७(३)(क) – बँकेचे मुख्य कार्यालयांत मुख्याधिकारी यांचे करिता कॅबीन बनविणेबाबत विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ७(३)(क) – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने सभेला माहिती देतांना सरव्यवस्थापक यांनी सांगितले की, बँकेचे मुख्याधिकारी श्रेणीतील अधिकारी विभागप्रमुख म्हणून काम करीत आहेत. लेखा विभागाचे विभाग प्रमुखांना स्वतंत्र अशी केबीन आहे. परंतु कर्ज विभाग; तपासणी विभाग, कर्ज वसुली विभाग प्रमुखां करिता स्वतंत्र केबीन नाहीत. कामकाजाचे व व्यवस्थेचे दृष्टिकोनातून सदर विभाग प्रमुखांकरिता स्वतंत्र केबीन तयार करण्याकरिता बँकेचे पॅनेलवरील आर्किटेक्ट यांचेकडून एस्टीमेट मागविण्यांत आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन कर्ज विभाग, कर्ज वसुली विभाग, तपासणी विभाग व प्रशासन विभाग या विभागाचे प्रमुखांसाठी केबीन तयार करणेसाठी मागविलेले एस्टीमेट मंजूर करण्याचे व त्यानुसार विभाग प्रमुखांकरिता केबीन बांधण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष महोदय यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७(३)(ड) – शाखा मोंढा येथील क्वार्टर व जुन्या इमारती समोरील रोड दुरुस्ती करणेबाबत..

ठराव क्रमांक ७(३)(ड) – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने सभेला माहिती देतांना मा. सरव्यवस्थापक यांनी सांगितले की, शाखा मोंढा येथील क्वार्टर बँकेचे एका शिपायास राहण्याकरिता उपलब्ध करुन देण्यांत आले होते. परंतु सदर क्वार्टरची

पडझड झाल्यामुळे पाऊस आला म्हणजे संपूर्ण गळत असल्यामुळे राहण्याचे दृष्टीने योग्य नाही, तसेच जुन्या इमारती समोरील शेड कुजल्यामुळे तुटले आहे त्यामुळे त्या ठिकाणी नविन शेड बसविणे आवश्यक आहे. याकरिता श्री चिंचमालातपूरे आर्किटेक्ट यांचेकडून वरील दोन्ही कामाकरिता एस्टीमेट मागविण्यात आले आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे (शिपाई) क्वार्टरमध्ये शिपाई राहणे बँकेचे सुरक्षिततेचे दृष्टिकोनातून योग्य आहे. यामुळे मोंढा येथील शिपाई क्वार्टर व जुन्या इमारती समोरील शेड दुरुस्तीसाठी मागविलेले एस्टीमेट मंजूर करण्याचे व त्यानुसार दुरुस्ती करण्याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार मा० अध्यक्ष महोदय यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७ (४) (अ) – शाखा महाल येथील झालेल्या अतिरिक्त जादा कामाचे एस्टीमेट मंजूरीबाबत...

ठराव क्रमांक ७ (४) (अ) – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले विषयानुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेची महाल शाखा विभागीय सहकारी बोर्डाचे इमारतीत किरायाने असून सदर जागेत कौंटर, सिव्हील वर्क्स व फर्निशिंग इत्यादि कामे करण्याकरिता रुपये २७८२५०/- मंजूरी प्राप्त आहे. परंतु काम करतांना याशिवाय जादाची कामे करणे आवश्यक झाल्याने बँकेचे पॅनेलवरील आर्किटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचेकडून एस्टीमेट मागविण्यांत आले आहे. जादा कामाचे एस्टीमेट खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| जादा कामाचे एस्टीमेट ५%चढउत्तार निधीसह | रुपये | ६४८३६=८२ |
| ४% आर्कीटेक्ट फी | रुपये | २५९३=४७ |
| ५% सर्व्हीस टॅक्स | रुपये | १२९=६७ |
| | एकूण रु. | ६७५५९=९७ |
| | राऊंडेड रुपये | ६७६००=०० |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन महाल शाखेचे किरायाचे जागेवरील आवश्यक असलेली जादा कामे करवून घेणेकरिता एस्टीमेटप्रमाणे येणाऱ्या रुपये ६७६००/-च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७ (४) (ब) – कोंढाळी शाखेकरिता स्वतःची इमारत असण्याचे दृष्टीने कोंढाळी येथे जागा खरेदी करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७(४)(ब) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. माननीय सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, दि.३१.७.९९ चे सभेत कोंढाळी शाखेकरिता स्वतःची इमारत बांधण्यासाठी श्री लध्दड यांचेकडून प्लॉट क्रमांक १० आणि ११ खरेदीबाबतचे दर ठरविणे व आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष महोदय यांना देण्यांत आले होते. त्या अनुषंगाने प्लॉट मालक श्री संजय मोहनलालजी लध्दड यांना दिनांक १८.९.९९ रोजी नागपूर येथे बँकेत चर्चेकरिता बोलाविण्यांत आले. दिनांक १८.९.९९ रोजी श्री लध्दड यांचेशी मा० अध्यक्ष महोदयाशी झालेल्या चर्चेनुसार कोंढाळी येथील दोन प्लॉट ऐवजी प्लॉट क्रमांक १० हा एकच प्लॉट १९९३.२९ चौरस फुट क्षेत्र असलेला रुपये २२५/- प्रति चौरस फुट दराने रुपये ४,४८,४९०.२५ ला खरेदी करण्याचे ठरले. रजिस्ट्री पूर्वी - रुपये ४,००,०००/- (अक्षरी रुपये चार लाख फक्त) अग्रिम मिळणेबाबत श्री लध्दड यांनी मागणी केली आहे. रजिस्ट्रीसाठी होणारा स्टँप व कोर्ट फी खर्च बँकेला करावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा० अध्यक्ष महोदय व श्री लध्दड यांचेत झालेल्या चर्चेतील वाटाघाटीनुसार कोंढाळी येथील श्री लध्दड यांचे मालकीचा प्लॉट क्रमांक १० हा एकच प्लॉट रुपये २२५/- प्रति चौरस फुट दराने १९९३.२९ चौरस फुट असलेला रुपये ४४८४९०.२५ ला खरेदी करण्यात यावा. श्री लध्दड यांनी मागणी केल्याप्रमाणे रुपये ४०००००/- (रुपये चार लाख फक्त) अग्रिम देण्यांत यावा. व अग्रिम दिल्यापासून एक महिन्याचे आंत रजिस्ट्री करुन घ्यावी आणि रजिस्ट्रीसाठी होणारा स्टँप व कोर्ट फी खर्च बँकेने ~~खर्च~~ करावा. ~~प्लॉट खरेदीसाठी व रजिस्ट्रीसाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.~~ असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर माननीय अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने झालेल्या चर्चेचा वृतांत खालील प्रमाणे.

मा० श्री र. गो. बेग संचालक यांनी बँकेचे ग्राहक/सभासदांना बँकींग सेवेचा लाभ मिळावा या दृष्टीने, कळमेश्वर तालुक्यातील गोंडखैरी व हिंगणा तालुक्यातील देवळी सावंगी येथे विस्तारीत कक्ष उघडण्यांत यावे. हिंगणा शाखेत सुवर्ण तारण ठेवून कर्ज देण्याची व्यवस्था त्वरित करण्यांत यावी. कुही शाखेची इमारत गळते तेथील दुरुस्ती करण्यांत यावी. मोहपा शाखा

इमारती करीता मोहपा अर्बोची जागा घेण्याबाबत विचार व्हावा, इत्यादि सुचना केल्यांत. मा. श्री. ग. के. शाहिर संचालक यांनी बँकेच्या कोणत्या शाखा तोट्यात आहे व कोणत्या शाखा नफ्यांत आहेत याबाबत माहिती विचारुन शाखा तोट्यांत जाण्याची कारणे काय आहेत. याबाबत सुध्दा माहिती विचारली. यावर माननीय सरव्यवस्थापक यांनी शाखा तोट्यांत जाण्याची कारणे काय आहेत याबाबत माहिती सांगितली. त्याच प्रमाणे त्या फायद्यात येण्याचे उपाय सांगितले.

मा. संचालकांनी केलेल्या सुचनांची नोंद घेण्यांत आल्याचे सांगून मा. अध्यक्ष यांनी सभेला उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. नागपूर.

बँकेच्या मा॰ व्यवस्थापक समितीची सभा गुरूवार दिनांक ३०.१२.९९ रोजी दुपारी २.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेचे अध्यक्ष माननीय श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.

या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा॰ श्री. र. गो. बंग | सदस्य |
| ४. | मा. श्री. भा. चं. शहाणे | " |
| ५. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ६. | मा॰ श्री. ब. भा. ताथवाडे | " |
| ७. | मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| ८ | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| ९. | मा. श्री. व. क. पाराशिवनीकर | " |
| १०. | मा. सौ. कु. ग. किंमतकर | सदस्या |
| ११. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

अनुपस्थित

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. ब. भा. वांढे | सदस्य |
| २ | मा॰ जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर | |
| ३. | मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह॰ संस्था (बँक), नागपूर. | |
| ४. | मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक लि. विभागिय कार्या. नागपूर. | |

सभेला सुरूवात करण्यापूर्वी अनुपस्थित असलेले सदस्य मा. श्री. बं. भा. वांढे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर उपस्थितांचे स्वागत करून विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरूवात करण्यांत आली.

विषय क्रमांक १ - मागील दिनांक २९.११.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना मा. श्री. र. गो. बंग म्हणाले की, ठराव क्र. ७(२) मध्ये शाखांसाठी खरेदी करण्यांत आलेल्या लॉकरची किंमत व बसविण्याचा खर्च घेण्यांत आलेला आहे. परंतु लॉकरचा प्रकार लिहिण्यांत आलेला नाही, लॉकरचा प्रकार लिहिण्यांत यावा. ठराव क्रमांक ७(३)(अ) चे बाबतीत मा. श्री. र. गो. बंग संचालक यांनी मुख्य कार्यालयाचे इमारतीचे वरच्या माळ्यावर रेकार्ड रूम बांधण्याकरिता मंजूर करण्यांत आलेल्या एस्टीमेटमधील ५% चढउतार निधी बाबत माहिती विचारली असतां मा० सरव्यवस्थापक यांनी माहिती दिली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन विषय क्रमांक ७(२) मध्ये लॉकरचा प्रकार लिहिण्यांत यावा असे ठरले. व मागिल दिनांक २९.११.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ – मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावानुसार कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागिल सभा दिनांक २९.११.९९ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मा० सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यात आली.

---

विषय क्रमांक ३ – बँकेचे माहे नोव्हेंबर १९९९ मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, माहे नोव्हेंबर १९९९ मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चाची माहिती सोबतचे टिपणी मध्ये देण्यांत आली आहे. विषयावर चर्चा करतांना मा० श्री. र. गो. बंग संचालक म्हणाले की, हिंगणा तालुक्याला कर्ज वसुलीसाठी जीपगाडी दिलेली आहे. तथापी विशेष वसुली अधिकाऱ्याकडून कर्ज वसुली दौरा कार्यक्रमाबाबत माहिती दिली जात नाही. यावर मा० सरव्यवस्थापक यांनी हिंगणा तालुक्याचे विशेष वसुली अधिकारी श्री घनरे यांना मेमो देण्यांत यावा, व खुलासा मागविण्यांत यावा. व कर्जवसुली जीपदौरा कार्यक्रमाची प्रत स्थानिक संचालक मा० श्री. र. गो. बंग यांना देणेकरिता कडक सुचना देण्यात यावी,

असे सांगितले. मा. श्री. ग. के. आहेर म्हणाले की, तालुक्याचे विशेष वसुली अधिकाऱ्यांना जीपगाडी दिल्यामुळे बँकेची कर्जवसुली निश्चितच वाढली असेल, तर सद्या कर्ज वसुलीचे प्रमाण काय आहे याबाबत माहिती विचारली. यावर मा. सरव्यवस्थापक यांनी सद्याचे कर्जवसुलीची माहिती दिली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे नोव्हेंबर १९९९मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ - बँकेचे माहे आक्टोंबर ९९ व नोव्हेंबर १९९९ चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेच्या तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे माहे आक्टोंबर ९९ व नोव्हेंबर ९९ चे ताळेबंद पत्रक टिपणी सोबत जोडले असून बँकेच्या तरला जींदगीच्या परिस्थिती बाबत सोबत टिपणी जोडले आहे. बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १८ प्रमाणे एकूण डिमांड ॲंड टाईम लायबीलिटिजच्या कमीत कमी ३% रोख निधी आणि कलम २४ प्रमाणे एकूण डिमांड ॲंड टाईम लायबीलिटिजच्या कमीत कमी २५% तरती जींदगी राखावयास पाहिजे. सोबत जोडलेल्या टिपणीवरुन प्रत्यक्षात तरती जींदगी विहित एकुणवारीपेक्षा जास्त राखलेली आहे असे दिसून येते. तरी निरनिराळ्या कर्जयोजना तयार करुन बँकेकडे असलेला सरप्लस निधी गुंतविणे आवश्यक आहे. स्वभांडवलातून कर्ज उपलब्ध करुन देणेकरिता दुग्ध व्यवसायाकरिता धोरण तयार करणे सुरु आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे आक्टोंबर ९९ व नोव्हेंबर ९९चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेच्या तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५ - धान्यगंज शाखा इमारतीमध्ये अतिरिक्त कामाकरिता मागविण्यांत आलेल्या एस्टीमेटबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, धान्यगंज शाखेत कामकाजाचे सोयीनुसार कॅश केबीन काउंटर व फर्निचरची इतर कामे यापूर्वीच पूर्ण करुन घेण्यांत आली आहेत. याशिवाय लोखंडी आलमारया, लॉकर

व शाखेचा रेकार्ड व्यवस्थित ठेवणेकरिता केबीन, पार्टिशन, रॅक्स बसविणे, कॅश केबीन पार्टिशन इत्यादि कामे करून घ्यायची आहेत. याकरिता बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचेकडून जादा कामाचे एस्टीमेट मागविण्यांत आले आहे. त्यांनी खालील प्रमाणे बँकेस एस्टीमेट दिले आहे.

| | |
|---|---|
| १. कॅबीन पार्टिशन पूर्ण तयार करणे | रुपये ११४००.०० |
| २. रॅक्स बसवून त्यावर सनमायकासीट लावणे व ऑईल पेंट करणे | रुपये ३२०२५.०० |
| ३. कॅश कॅबीन पार्टिशन, सनमायका टॉप जाळी बसविणे, डोअर शटर बसविणे इत्यादि कामे एस्टीमेंटमध्ये नमुद केल्याप्रमाणे | रुपये २१६००.०० |
| एकूण | रुपये ६५०२५.०० |
| अ) कन्टेजन्सी निधी ५% | रुपये ३२५१.२५ |
| ब) आर्कीटेक्ट फी ४% | रुपये २७३१.०० |
| क) आर्कीटेक्ट फीवर सर्विस चार्ज ५% | रुपये १३६.०० |
| एकंदर | रुपये ७११४३.२५ |
| | रुपये ७११५०.०० |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन धान्यगंज शाखेतील अतिरिक्त जादाचे काम करण्याकरिता श्री चिंचमलातपूरे आर्कीटेक्ट यांनी दिलेल्या रुपये ७११५०.०० च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६ – बँकेचे आर्कीटेक्ट पॅनेलवर नियुक्तीसाठी आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ६ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देताना सांगितले की, बँकेचे आर्कीटेक्ट पॅनेलवर घेणेबाबत खालीलप्रमाणे अर्ज आलेले आहेत.

१. मे. एस. के. चिचघरे अँड असोशिएटस्, नागपूर
२. मे. अनंत खारपाटे, आर्कीटेक्ट, नागपूर
३. मे. सुनील सावरकर, आर्कीटेक्ट, नागपूर
४. मे. पांगारकर आर्कीटेक्ट नागपूर.
५. श्री अशोक मोखा आर्कीटेक्ट, नागपूर.

27

Cancelled

बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा गुरुवार दिनांक ३०.१२.९९ रोजी दुपारी ४.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष माननीय श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.

या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

| | |
|---|---|
| १. मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा० सौ० आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा. श्री. र. गो. बैंग | सदस्य |
| ४. मा० श्री. भा. चं. शहाणे | " |
| ५. मा० श्री. शा. श्री. धवड | " |
| ६. मा० श्री. ब. भा. तायवाडे | " |
| ७. मा० श्री. ग० के० शाहिर | " |
| ८. मा० श्री. चं. तु. समर्थ | " |
| ९. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर | " |
| १०. मा. सौ० कु. गा. किंमतकर | सदस्या |
| ११. मा० श्री. ए. एस. चौधरी | सरव्यवस्थापक |

अनुपस्थित

| | |
|---|---|
| १. मा० श्री. व. भा. वांढे | सदस्य |
| २. मा० जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर. | |
| ३. मा० विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सह० संस्था (बँके), नागपूर. | |
| ४. मा० विभागीय अधिकारी, म.रा.राज्य. सह.बँक म० विभागीय कार्यालय नागपूर | |

सभेला सुरुवात करण्यापूर्वी अनुपस्थित असलेले सदस्य मा० श्री व. भा. वांढे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर उपस्थितांचे स्वागत करुन विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात करण्यांत आली.

Cancelled

विषय क्रमांक १ - मागील दिनांक २९.११.९९

उपरोक्त अर्जदारांनी बँकेचे आर्कीटेक्ट पॅनेलवर घेणेबाबत विनंती अर्ज केलेले आहेत. व सोबत त्यांनी त्यांचे कामाचे अनुभवाबाबत माहिती दिलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त आर्कीटेक्ट अर्जदारांची पात्रता व अनुभव विचारांत घेऊन बँकेचे आर्कीटेक्ट पॅनेलवर घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७ – मा० अध्यक्ष महोदय यांचे माहे डिसेंबर १९९१चे प्रवास भत्ता बील मंजूर करणे.

ठराव क्रमांक ७ – मा० अध्यक्ष महोदय महाल कॉम्प्लेक्स व नविन शाखा परवानगी बाबत मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे येथे चर्चा करण्यासाठी माहे डिसेंबर १९९१ मध्ये गेले असल्याने त्यांनी सादर केलेले माहे डिसेंबर १९९१चे प्रवास भत्ता बील रुपये १७३२/- मंजूर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ८ – मा० अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ८(१) – महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे रुपये ५.४६ लाखाचे अतिरिक्त भाग खरेदी करता मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ८(१) – महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमि. मुंबई यांचे कडून घेतलेल्या कर्जावर नियमाप्रमाणे ४% प्रमाणे शेअर्स खरेदी करावयाचे असल्याने रुपये ५.४६ लाखाचे भाग खरेदीस मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत करावयाच्या अर्जावर सह्या करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ८(२) – रामनगर शाखेकरिता नविन किरायाची जागा घेणेबाबत.

ठराव क्रमांक ८(२) – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सद्या किरायाने असलेली रामनगर शाखेची जागा अपूरी पडत असून ग्राहकांच्या सोयीचे दृष्टीने अडचणीची झाली आहे. आपल्या बँकेचे रामनगरला कार्यालयास श्री राणाप्रतापसिंग यांनी त्यांची

जागा किरायाने देणेबाबत बँकेकडे अर्ज केला आहे. ही जागा अंदाजे १३०० चौरस फुट क्षेत्रफळाची असून तळमजल्यावर आहे. श्रीमान राणाप्रतापसिंग यांचेशी झालेल्या चर्चेनुसार सदर जागा रुपये ४/- प्रती चौरस प्रति महिना किराया व रुपये ४/- प्रती चौरस फुट प्रति महिना मेंटनन्स दराने असे एकूण रुपये ८/- प्रतिचौरस फुट प्रती महिना दराने देण्याचे कबुल केले असुन रुपये १०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) बिनव्याजी डिपॉझिटची मागणी केली आहे. डिपाझीट दिलेली रुपये १०,००,०००/- रकमेची वसुली देय भाड्यातून प्रतिमाह रुपये ६०००/- प्रमाणे करून देणार आहे. कॉर्पोरेशन टॅक्स घरमालक भरण्यास तयार आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री राणाप्रतापसिंग यांची १३०० चौरस फुट क्षेत्रफळ असलेली जागा रामनगर शाखा कार्यालयासाठी रुपये ८/- प्रति चौरस फुट प्रति महिना (रुपये ४/- किराया व रुपये ४/- मेंटनन्स चार्जेस प्रती चौरस फुट प्रति महिना) प्रमाणे घेण्यात यावी. याकरिता घरमालकांना रुपये ५.०० लाख बिनव्याजी डिपॉझीट ७ वर्षे मुदतीकरिता देण्यात यावे. व दरमहाचे किरायातून रुपये ६०००/- प्रमाणे रुपये ५.०० लाख रकम पूर्ण वसुल होईपर्यंत कपात करण्यांत यावे. महानगरपालिका कराचा भरणा घर मालकांनी करावा. याबाबत करारनामा करण्याचे अधिकार माननीय अध्यक्ष महोदय व सरव्यवस्थापक यांना देण्यात येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ८(३अ) — मौदा शाखा येथील जुन्या इमारतीचे शेडचे व चौकिदार क्वार्टर्सचे कामाकरिता इस्टीमेट बाबत विचार करुन मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ८(३अ) — मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मौदा शाखेचे जुन्या इमारती-समोरील शेड व चौकिदार क्वार्टर तयार करण्याकरिता बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपुरे यांचेकडून इस्टीमेट मागविण्यांत आले आहे. त्यांनी इमारती समोरील शेड तयार करण्याकरिता रुपये ४०३८५.९२ चे व शिपाई क्वार्टर तयार करण्याकरिता रुपये १००४०७.५९ चे इस्टीमेट बँकेस सादर केले आहे.

| एकूण कामाचे इस्टीमेट | शेडचे इस्टीमेट | चौकिदार क्वार्टरचे इस्टीमेट. |
|---|---|---|
|  | — |  |

| | | |
|---|---|---|
| एकूण कामाचे इस्टीमेट | रु.३८७५८.०८ | रु.९६३६०.४५ |
| ४% आर्कीटेक्ट फी | रु. १५५०.३२ | रु. ३८५४.४२ |
| ५% (आर्कीटेक्ट फीवरील) | | |
| सर्व्हिस टॅक्स | रु. ७७.५२ | रु. १९२.७२ |
| एकूण अंदाजपत्रक रुपये | ४०३८५.९२ | रुपये १००४०७.५९ |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मोंढा शाखेचे जुन्या इमारती-समोरील शेडचे व चौकीदार क्वार्टरचे काम करण्याकरिता अनुक्रमे रुपये ४०३८५.९२ व रुपये १००४०७.५९ चे इस्टीमेट मंजूर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ८ (३ब) — कुंभी शाखा येथील इमारती मध्ये किरकोळ दुरुस्तीचे इस्टीमेट बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८ (३ब) - मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, बँकेची कुंभी शाखेची इमारत स्वमालकीची असून इमारतीमधील फ्लोअरींग, इलेक्ट्रीक फिटींग, सुरीतील दुरुस्ती करुन घेणे आवश्यक झाले आहे. तसेच शाखेचे इमारतीवर पॅराफीट वॉल बांधायची आहे. याकरिता बँकेचे आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचेकडून कामाचे इस्टीमेट मागविण्यांत आले आहे. त्यांनी खालीलप्रमाणे इस्टीमेट सादर केले आहे.

| | |
|---|---|
| एकूण कामाचे इस्टीमेट | रुपये ७८१७५.२० |
| ४% आर्कीटेक्ट फी | रुपये ३१२७.०० |
| ५% (आर्कीटेक्ट फी वरील) सर्व्हिस टॅक्स | रुपये १५६.०० |
| एकूण अंदाजपत्रक रुपये | ८१४५८.२० |

---

विषय क्रमांक ८ (४) — बँकेचे पॅनेलवरील श्री. पी० एस० ठाकरे चार्टर्ड अकाउंटंट यांनी त्यांची फी कमी न करण्याबाबत केलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ८ (४) — दिनांक ३०.९.९९ रोजीचे सभेत श्री. पी० एस० ठाकरे चार्टर्ड अकाउंटंट यांना बँकेकडे येणाऱ्या कर्जप्रकरणासोबतचे प्रकल्प अहवालाची छाननी करुन सक्षमता आजमाविणे व बँकेला योग्य अभिप्राय देणे याकरिता बँकेचे पॅनेलवर नियुक्ती देण्यात आली होती. व प्रकल्पाची किंमत लक्षांत घेऊन फी ठरविण्यांत आली होती.

परंतु दिनांक ३०.९.९९ रोजीचे सभेत ठरविण्यांत आलेले फीचे दर दिनांक ३०.१०.९९ रोजीचे सभेत फीचे दर कमी करण्याबाबत सुचविल्यानुसार खालील प्रमाणे दुरुस्ती घेण्यांत यावी.

| प्रकल्पाची किंमत | ३०।८।९९ चे सभेत ठरविण्यात आलेली फी | दिनांक ३०।१०।९९चे सभेत फी कमी करुन सुचविण्यात आलेल्या दुरुस्ती प्रमाणे फी. |
|---|---|---|
| रुपये ५.०० लाखापर्यंत | रुपये १५००/- | रुपये १०००/- |
| रुपये ५.०० लाखाचे वरील ते रु. १०.०० लाखापर्यंत | रुपये २५००/- | रुपये २०००/- |
| रुपये १०.०० लाखाचे वरील ते रु. १.०० कोटिपर्यंत | रुपये ६०००/- | रुपये ५०००/- |
| रुपये १-०० कोटीचे वरील | रुपये १२०००/- | रुपये १०,०००/- |

वरीलप्रमाणे दिनांक ३०.१०.९९ चे सभेतील निर्णयानुसार श्री. पी. एस. ठाकरे, चार्टर्ड अकाउंटंट यांना ठरविण्यात आलेल्या फी बाबत कळविण्यात आले. परंतु श्री ठाकरे यांनी दिनांक १३।१२।९९रोजी बँकेस पत्र पाठवून त्यांनी दिलेले फी चे दर अगदी रास्त असल्याचे नमुद करुन दिनांक ३०।८।९९ चे सभेतील निर्णयानुसार आकारण्यात आलेली फी कमी करु नये अशी विनंती केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री. पी. एस. ठाकरे यांचे दिनांक १३।१२।९९ चे पत्रावर विचार करुन दिनांक ३०।८।९९ चे सभेत ठरल्या प्रमाणे फी चे दर कायम ठेवण्यात यावे असे ठरले.

| प्रकल्पाची किंमत | आकारावयाची फी |
|---|---|
| रु. ५-०० लाखा पर्यंत | रु. १५००/- |
| रु. ५-०० लाखाचे वरील रु १०.०० लाखापर्यंत | रु. २५००/- |
| रु. १०.०० लाखाचे वरील रु. १ कोटी पर्यंत | रु. ६०००/- |
| रु. १. कोटीचे वरील | रु. १२०००/- |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८(५) – झिंगाबाई टाकळी या नियोजीत शाखेकरिता किरायाने इमारत घेणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ८(५) – मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, झिंगाबाई टाकळी येथे नविन शाखा उघडण्यासाठी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

यांनी परवानगी दिलेली आहे. मिळालेल्या परवानगीनुसार शाखा उघडण्यासाठी किरायाने मकान पाहण्यात आले. श्री वसंतराव मोथे यांनी त्यांची मालकीची इमारत बँकेकरिता किरायाने देण्यासंबंधी अर्ज दिला असून त्यांनी त्यांचे मालकीची झिंगाबाई टाकळी येथील इमारतीचे पहिल्या माळ्यावरील १८०० चौ.फुट जागा रुपये ३/- प्रमाणे किराया व रुपये २/- प्रमाणे मेंटेनन्स चार्जेस असे रुपये ५/- प्रती चौ.फुट दराने देण्याची दर्शविली आहे झालेल्या चर्चेनुसार इलेक्ट्रिक बील्स व पाण्याचे बील्स बँकेने भरायचे असून कार्पोरेशन टॅक्स घरमालक भरणार आहे सदर मकानाचे काही सिव्हील काम पूर्ण करायचे असल्याने सांगून त्यांनी सदर काम पूर्ण करुन देणेकरिता रुपये ३.०० लाख ॲडव्हान्सची मागणी केली आहे. व ही ॲडव्हान्सची रक्कम दरमहा मिळणाऱ्या किरायाचे रकमेतून कपात करुन देणार आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन झिंगाबाई टाकळी येथे नविन शाखा उघडणेसाठी श्री वसंतराव बी. मोथे यांचे मालकीची झिंगाबाई टाकळी येथील इमारतीचे पहिल्या माळ्यावर असलेली १८०० चौ.फुट जागा किराया रुपये ३/- व मेंटेनन्स चार्जेस रुपये २/- असे एकूण रुपये ५/- प्रती चौ.फुट प्रतिमाह दराने घेण्यात यावी. मागणी केल्याप्रमाणे रु. ३.०० लाख १६% व्याज दराने त्यांना ॲडव्हान्स देण्यात यावा. व ही ॲडव्हान्सची रक्कम रुपये ३.०० लाख व्याजासह पूर्ण वसूल होईपर्यंत प्रतिमाह द्यावयाचे किराया मधून दरमहा ५ वर्षाचे कालावधीत कपात करुन घ्यावी. कार्पोरेशन टॅक्स घरमालकाने भरावयाचा असून इलेक्ट्रिक बील्स व पाणी बील्स बँकेने भरावे. याबाबत करारनामा करण्याचे अधिकार मा. सरव्यवस्थापक यांना देण्यात येत आहे. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे सुचनेनुसार मा. उपाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(सही) सरव्यवस्थापक

(सही) अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमी., नागपूर

बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा शुक्रवार दिनांक २८।१।२००० रोजी दुपारी १.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष माननीय श्री सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. सदर सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

– उपस्थित –

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. भा. चं. शहाणे | सदस्य |
| ३. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ४. | मा. श्री. श्री. ग. धवड | " |
| ५. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |
| ६. | मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| ७. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| ८. | मा. श्री. व. के. पाराशिवनीकर | " |
| ९. | मा. श्री. एस. एस. गोडे | प्र. व्यवस्थापक |

– अनुपस्थित –

| | | |
|---|---|---|
| १. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| २. | मा. श्री. र. गो. बंग | सदस्य |
| ३. | मा. सौ. कु. ग. किंमतकर | " |
| ४. | मा. जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर | |
| ५. | मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक), नागपूर | |
| ६. | मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक मर्या. विभा. कार्यालय, नागपूर. | |
| ७. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक. |

मा. सौ. आशाताई महाजन, उपाध्यक्षा, मा. सौ. कु. ग. किंमतकर, संचालीका ह्या म्हैसूर येथील नेतृत्व विकास प्रशिक्षणासाठी गेल्याने, तसेच मा. श्री. ए. एन. चौधरी, सरव्यवस्थापक बँकेचे कर्जवसुली सभेला गेले असल्याने मा० व्यवस्थापक समितीचे सभेत उपस्थित नाहीत असे सांगून, सभेला सुरुवात करण्यापूर्वी अनुपस्थित असलेले सदस्य मा. सौ. आशाताई महाजन, उपाध्यक्षा, मा. श्री. र. गो. बंग आणि मा. सौ. कु. ग. किंमतकर यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर उपस्थितांचे स्वागत करुन विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात करण्यांत आली.

विषय क्रमांक १ - मागील दिनांक ३०।१२।९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत कायम करणे.

ठराव क्रमांक १ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक ३०।१२ ९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ — मागील सभेत पारित झालेल्या ठरावानुसार कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील सभा दिनांक ३०।१२।९९ रोजीचे सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मा. प्रभारी व्यवस्थापक यांनी सभेला माहिती दिली कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ - बँकेचे माहे डिसेंबर १९९९ मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणि सभेला माहिती देतांना सांगितले की, माहे डिसेंबर १९९९ मधील व्यवस्थापन खर्चा बाबतची माहिती सोबतचे स्टेटमेंटनुसार सभेला देण्यांत आलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे डिसेंबर १९९९ मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ४ - बँकेचे माहे डिसेंबर १९९९ चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेच्या तरता जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे माहे डिसेंबर १९९९चे ताळेबंद पत्रक स्थिती सोबत जोडले असून बँकेच्या तरता जींदगीच्या परिस्थितीची माहिती सोबत दिलेली आहे. बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १८ प्रमाणे एकूण डिमांड ॲंड टाईम लायबीलीटीजच्या कमीत कमी ३% रोख निधी आणि कलम २४ नुसार एकूण डिमांड ॲंड टाईम लायबीलीटीजच्या कमीत कमी

२५% तरती जींदगी राखावयाची आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे माहे डिसेंबर ९९चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेच्या तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यात आली.

---

विषय क्रमांक ५ :— बँकेत वकिलांचे पॅनेलवर नियुक्तीसाठी वकिलाकडून आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५ — मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, ॲड. एन.एम. तायडे यांनी त्यांना बँकेत असलेल्या वकीलांचे पॅनेलवर नियुक्ती करुन बँकेच्या केसेस सोपविण्याबाबत दिनांक १५।१।२००० रोजी विनंती अर्ज केला आहे. त्यांना वकिली व्यवसायाच्या २८ वर्षाचा अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच त्यांना उच्च न्यायालय, लेबर, औद्योगिक न्यायालय, सिव्हील कोर्ट येथील कामाचा अनुभव असून त्यांचेकडे अद्यावत लायब्ररी देखील असल्याचे म्हटले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन ॲड. एन.एम. तायडे यांना त्यांचे कामाचा अनुभव लक्षात घेता त्यांना बँकेचे वकीलांचे पॅनेलवर घेण्यात यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ — मा० अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे व निर्णय घेणे.

विषय क्रमांक ६(१) — झिंगाबाई टाकळी येथील शाखेकरिता किरायाने घेतलेल्या इमारतीमध्ये फर्निशिंग कामाचे इस्टीमेट बाबत विचार करुन मंजुरी देणे.

ठराव क्रमांक ६(१) — मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, झिंगाबाई टाकळी येथे बँकेची नविन शाखा उघडण्याकरिता श्री. वसंतराव मोथे यांची जागा किरायाने घेण्यात आली आहे. या इमारतीमध्ये फर्निशिंग वर्क्स करुन घेणेकरिता श्री चिंचमलातपूरे, आर्कीटेक्ट (बँकेचे पॅनेलवरील) यांचे कडून खर्चाचे अंदाजपत्रक मागविण्यात आले. त्यांनी खालीलप्रमाणे रुपये १२०९६०=२८ चे अंदाजपत्रक सादर केले आहे.

एकुण फर्निशिंग कामाचे एस्टीमेट - रु. १२२८२२=६३
४% आर्किटेक्ट फी रु. ४९१२=००
५% (आर्किटेक्ट फीवरील) सर्व्हिस टॅक्स रु. २४५=६४
एकूण रु. १२७९८०=२६

विषयावर सविस्तर चर्चा होऊन झिंगाबाई टकळी येथे नविन शाखा उघडण्यासाठी किरायाचे ईमारतीमध्ये फर्निशिंग वर्क्स कामाकरिता श्री. चिंचमलातपूरे, आर्किटेक्ट यांनी सादर केलेले रु. १२७९८०=२६ चे अंदाज-पत्रक मंजूर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६(२) – शाखा रामनगर येथील नविन किरायाचे जागेत सिव्हील व फर्निशिंग कामाचे एस्टीमेटबाबत विचार करुन मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ६(२) – मा० अध्यक्ष यांनी वरील विषयाचे वाचन केले, व सभेला माहिती देतांना सांगितले की, रामनगर येथे किरायाने असलेल्या शाखा रामनगरसाठी किरायाची नविन इमारत श्री. राणाप्रतापसिंग यांची जागा किरायाने घेण्यात आली आहे. तेथे सिव्हील व फर्निशिंग वर्क्स करावयाचे असल्याने बँकेचे पॅनेलवरील आर्किटेक्ट श्री अरुण चिंचमलातपूरे यांचेकडून एस्टीमेट मागविण्यात आले आहे. सदर कामाबाबतचे एस्टीमेट रुपये २६६७१४=३४ चे सादर केले आहे.

एकूण सिव्हील कामाचे एस्टीमेट व फर्निशिंग कामाचे एस्टीमेट } रु. २५५९६३=८६
४% आर्किटेक्ट फी रु. १०२३८=५५
५% (आर्किटेक्ट फीवरील) सर्व्हिस टॅक्स रु. ५११=९३
एकूण रु. २६६७१४=३४

विषयावर सविस्तर चर्चा होऊन रामनगर येथे नविन किरायाचे इमारतीमध्ये सिव्हील व फर्निशिंग कामाकरिता श्री चिंचमलातपूरे, आर्किटेक्ट यांनी सादर केलेले रु. २६६७१४=३४ चे अंदाज-पत्रक मंजूर करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६(३) – शाखा कोंढाळीसाठी घेतलेल्या प्लॉटवर स्वमालकीची इमारत बांधकामाच्या व फर्निचरच्या एस्टीमेटबाबत विचार करुन

मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ६(३) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, कोंढाळी येथे बँकेची शाखा किरायाची असून तेथे स्वमालकीची इमारत असावी म्हणून बँकेने प्लॉट खरेदी केला आहे. बँकेनी खरेदी केलेल्या प्लाटवर इमारत बांधकामासाठी इमारतीमधील फर्निचर, कॅशियर कॅबीन इत्यादि तयार करणेकरिता बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्ट श्री अनंत खारपाटे यांचेकडून एस्टीमेट मागितले आहे. यांनी खालीलप्रमाणे रुपये १०५१८४२.५७-चे एस्टीमेट सादर केले आहे.

| | |
|---|---|
| एकुण बांधकामाचे एस्टीमेट कंपौंडवाल व इलेक्ट्रीक फिटींगसह आणि फर्निचरचे एस्टीमेट काउंटर, केबीन पार्टिशन इत्यादिसह | रु. १०१८६७४.५९ |
| ४% आर्कीटेक्ट फी | रु. ३८८०६.६५ |
| ५% (आर्कीटेक्ट फीवरील) सर्विस टॅक्स | रु. १९४०.३३ |
| एकूण | रु. १०५१८४२.५७ |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कोंढाळी येथे बँकेची स्वमालकीची इमारत असण्याचे दृष्टीने खरेदी केलेल्या प्लॉटवर इमारत बांधकामाबाबत व फर्निचर करिता येणाऱ्या खर्चाचे बँकेवरील आर्कीटेक्ट श्री अनंत खारपाटे यांनी सादर केलेले रु. १०५१८४२.५७-चे एस्टीमेट मंजूर करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६(४) - बँकेतील शिपाई व ड्रायव्हर यांना देण्यात येणाऱ्या ड्रेसला व ड्रेस शिलाईला मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक ६(४) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दोन वर्षापूर्वी बँकेला शिपाई व ड्रायव्हर श्रेणीतील कर्मचाऱ्यांना दोन गणवेष शिवण्याकरिता कापडाचे वाटप करण्यात आले होते. व गणवेष शिवून आणल्यानंतर दोन गणवेषाची शिलाई ड्रायव्हर यांना रु. २२५/- व शिपाई यांना रुपये २५०/- देण्यात आली होती. ड्रायव्हर व शिपाई श्रेणीतील कर्मचाऱ्यांना दोन वर्षातून एकदा २ गणवेष शिवण्याकरिता कापड व त्याकरिता लागणारी शिलाई बँकेने द्यावी असे धोरण

असल्याने या वर्षीसुध्दा (पुरुष) शिपायी व ड्रायव्हर यांना गणवेषासाठी कापड व शिलाई द्यावयाची आहे. तसेच महिला शिपाई यांना दोन साड्या व दोन ब्लाऊजसाठी कापड द्यावयाचे आहे. मागील दोन वर्षापेक्षा यावेळेस ड्रेस शिलाईचे दर वाढवून द्यावे लागतील. ड्रायव्हर व शिपायी यांना २ ड्रेसची शिलाई रु. २७५/- व महिला शिपायी यांना दोन ब्लाऊजची शिलाई रु. ६०/- द्यावी लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे ड्रायव्हर व शिपायी (पुरुष) यांना दोन गणवेष कापडाचे वाटप करण्यात यावे व महिला शिपायी यांना दोन साड्या व दोन ब्लाऊजसाठी कापड देण्यात यावे असे ठरले. तसेच दोन ड्रेस शिलाईकरिता रु. २७५/- व ब्लाऊज शिलाई करिता रु. ६०/- असे दर मान्य करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६(५) - शाखा रामनगर येथील स्ट्राँगरुम डोअर, लॉकर्स व तिजोऱ्या नविन किरायाचे जागेत शिफ्टींग बाबत येणाऱ्या खर्चास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ६(५) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, शाखा रामनगरसाठी किरायाची नविन इमारत श्री राणाप्रतापसींग यांची जागा किरायाने घेण्यांत आली आहे. किरायाचे जुन्या इमारतीमधील एक स्ट्राँगरुम डोअर, ३ लॉकर्स व दोन तिजोऱ्या नविन किरायाचे जागेत शिफ्टींग करावयाच्या आहेत. याकरिता अंदाजे खर्च रु. २३०५०/- होईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन रामनगर शाखेच्या किरायाचे जुन्या इमारतीमधून नविन इमारतीमध्ये स्ट्राँगरुम डोअर, लॉकर्स व तिजोऱ्या शिफ्टींग करण्याकरिता येणारा खर्च रु. २३०५०/- चे अंदाज पत्रकास मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६(६) - नियोजीत शाखा झिंगाबाई टाकळीकरिता स्ट्राँगरुम डोअर व लॉकर्स खरेदी करण्याबाबत मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ६(६) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, झिंगाबाई टाकळी येथे नविन शाखा सुरु करावयाची असून त्याकरिता किरायाची ईमारत घेण्यात

आली आहे. तेथे स्ट्रॉंगरुम डोअर, व लॉकर्सची सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची आहे. याकरिता ३ प्रतिष्ठानांकडून मागविलेल्या कोटेशनपैकी किमान दराच्या व वस्तुचा दर्जा पाहून मे. प्राचीत इंटर-प्रायजेस नागपूर यांनी दिलेल्या कोटेशन प्रमाणे "कब स्टिलएज" कंपनीचे स्ट्रॉंगरुम डोअर व लॉकर्स खरेदी करावयाचे आहेत.

| अ.क्र. | विवरण | किंमत | फिटींग चार्ज (पहिल्या मजल्यावर) |
|---|---|---|---|
| | कब स्टिलएज कंपनीचे | | |
| १. | स्ट्रॉंगरुम डोअर | रु. ८०९३३.०० | रु. ३३००.०० |
| २. | -"- ५१ युनीट | रु. ७६३३९.०० | रु. २५००.०० |
| ३. | एअर व्हेन्टीलेशन | रु. १२१०४.०० | रु. — |
| | एकूण | रु. १६८५७६.०० | रु. ५८००.०० |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन झिंगाबाई टाकळी येथे किरायाचे नविन शाखा इमारतीमध्ये मे. प्राचीत इंटरप्रायजेस, नागपूर यांचेकडील कोटेशनप्रमाणे कबस्टिलएज कंपनीचे स्ट्रॉंगरुम डोअर व लॉकर्स व एअर व्हेन्टीलेशन रु.१६८५७६.०० ला खरेदी करणेकरिता शाखेच्या पहिल्या मजल्यावर रु.५८००/- खर्चाने बसवून घेणेकरिता मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६ (७) - महाल येथील डी.डी.आर. ऑफीसचे दुरुस्तीचे बीलास मंजूरी देणे बाबत.

ठराव क्रमांक ६ (७) - बँकेच्या मालकीच्या महाल येथील इमारतीमध्ये जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर व जील्हा उपनिबंधक, शहर-१ यांचे कार्यालय किरायाने असून त्या इमारतीमध्ये मा. जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी सांगितल्याप्रमाणे किरकोळ दुरुस्त्या करण्यांत आल्या आहेत. किरकोळ दुरुस्तीकरिता रु.१२३००/-चे एस्टीमेट मंजूर करण्यांत आले होते. सदर कामाची मे. सौदामिनी बिल्डर्स यांनी रु. १२१३६/-ची बीले सादर केली आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मे. सौदामिनी बिल्डर्स यांनी सादर केलेले महाल येथील बँकेचे इमारतीमधील डी.डी.आर. यांचे ऑफीसमध्ये केलेल्या किरकोळ दुरुस्तीचे बील रु.१२१३६/- मंजूर करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६(८) - शाखा महाल येथील कामाचे बील मंजूर करणे.

ठराव क्रमांक ६(८) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, विभागिय सहकारी मंडळ महाल यांचे जागेत शाखा महाल स्थानांतरीत केल्यानंतर फर्निचर, कॅश कॅबीन, रेकार्ड रूम, स्ट्राँग रूम, व्यवस्थापक कॅबीन इत्यादि कामाचे अंतीम बील रु. ६०५५५/- मे० प्रीती बिल्डर्स यांनी सादर केले असून या बीलावरील आर्कीटेक्ट फी रूपये २५४५/- चे बील आर्कीटेक्ट यांनी सादर केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मे० प्रीती बिल्डर्स यांनी सादर केलेले महाल शाखेतील अंतिम कामाचे बील रूपये ६०५५५/- व आर्कीटेक्ट यांनी सादर केलेली फी रूपये २५४५/- चे बील मंजूर करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६(९) - जप्तीमधील वाहने लिलाव संबंधाने दिनांक १०।१।९९ व दिनांक ३।१।२००० चे जाहिरातीचे बीलास मंजूरी देणेबाबत.

ठराव क्रमांक ६(९) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मध्यम मुदत कर्ज वाट्पा अंतर्गत व रोड ट्रान्सपोर्ट कर्ज वाटपा अंतर्गत कर्जावर दिलेल्या वाहनाचे कर्जाचे हप्ते थकित झाल्याने जप्त करण्यात आलेल्या वाहनाच्या लिलाव करणेसाठी राठी पब्लीसीटी द्वारे जाहिरात देण्यात आली होती.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन राठी पब्लीसीटी, नागपूर यांनी दिनांक १०।१।९९ व दिनांक ३।१।२००० रोजी वाहनाच्या लिलाव संबंधाने दिलेल्या जाहिरातीची सादर केलेली बीले अनुक्रमे रूपये ४३२०/- व रूपये ४३२०/- ची मंजूर करण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६(१०) - कॅश वाटप व वसुलीचे कामाकरिता किरायाने घेतलेल्या जीपगाड्यावर झालेल्या खर्चाचे बील मंजूरीबाबत.

ठराव क्रमांक ६(१०) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत शाखामध्ये कॅश ने-आण करण्यासाठी व वसुलीचे कामाकरिता किरायाने जीपगाड्या घेतलेल्या आहेत. किरायाने घेतलेल्या जीपगाड्यांचे गाडीमालकाने खालीलप्रमाणे बील सादर केली आहेत.

(रूपयांत)

| अ.क्र. | गाडीचा क्रमांक | महिना | दिवस | दर | बीलाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | एमएच ३१-एच ९५७२ | नोव्हेंबर ९९ | १७ | ३००/- | ५१००/- |
| | | डिसेंबर ९९ | २२ | ३००/- | ६६००/- |
| २. | एमएच ३१-एच १२५२ | " | १६ | " | ४८००/- |
| ३. | एमएच ३१-जी ८४८० | " | २२ | " | ६६००/- |
| ४. | एमएच ३१-एच ४४५४ | " | २० | " | ६०००/- |
| ५. | एमएच ३१-एच ९६६३ | " | २० | " | ६०००/- |
| ६. | एमएच ३१-एच २९०८ | " | १९ | " | ५७००/- |
| ७. | एमएच ३१-एच १९८९ | " | २१ | " | ६३००/- |
| ८. | एमएच ३१-जी ७०८९ | " | १७½ | " | ५२५०/- |
| ९. | एमएच ३१-जी ८९६५ | " | २० | " | ६०००/- |
| १०. | एमएच ३१-एच १६३ | " | २६ | " | ७८००/- |
| ११. | एमएच ३१-जी ८१३४ | " | २६ | " | ७८००/- |
| १२. | एमएच ३१-जी ४२६२ | " | २५ | " | ७५००/- |
| १३. | एमझेडव्ही - ५७८ | " | १४ | " | ४२००/- |
| १४. | एमएच ३१-जी ५६३१ | " | २३ | " | ६९००/- |
| | | | | एकूण | ९२५५०/- |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन वरीलप्रमाणे गाडी मालकाने सादर केलेली रुपये ९२५५०/- रकमेची १५ बील मंजूर करण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६(११) - मा० अध्यक्ष यांचे माहे जानेवारी २०००चे प्रवास भत्ता बील मंजूर करणे.

ठराव क्रमांक ६(११) - मा० अध्यक्ष यांचे नाबार्ड कर्ज मंजूरीचे अडी-अडचणीबाबत व आर्थिक विश्लेषकाचे नियुक्तीचे पूर्व मंजूरी बाबत आणि जिल्हा बँकांचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची संयुक्त सभेस पुणे येथे जाण्या-येण्याचे माहे जानेवारी २०००चे रुपये १९१९८/-चे प्रवासभत्ता बील मंजूर करण्यात आले.

यानंतर सभेसमोर विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

प्र० व्यवस्थापक — अध्यक्ष

दि नागपूर जील्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमी., नागपूर.

बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा शनिवार दिनांक २६।०२।२००० रोजी दुपारी १२.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात" बँकेचे अध्यक्ष मा.श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. सदर सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. | मा० सौ० आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा० श्री० र. गो. बंग | सदस्य |
| ४. | मा. श्री. भा. वं. शहाणे | " |
| ५. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ६ | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ७. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |
| ८. | मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| ९. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| १०. | मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| ११. | मा. सौ० कु. ग. किंमतकर | " |
| १२. | मा. श्री. एस. एस. गोडे | प्र० व्यवस्थापक |

- अनुपस्थित -

१. मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
२. मा० विशेष लेखा परिक्षक वर्ग-१. सह संस्था (बँक), नागपूर
३. मा० विभागिय अधिकारी, म. रा. सह. बँक लिमी. विभागिय कार्यालय, नागपूर
४. मा० एन. एन. चौधरी. सरव्यवस्थापक.

सभेच्या सुरुवातीला उपस्थितांचे स्वागत करुन बँकेचे सरव्यवस्थापक कर्ज वसुली दौऱ्यावर असल्याने सभेला उपस्थित नाहीत अशी माहिती देऊन विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस मा० अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक २८.१.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सभेत सविस्तर चर्चा होऊन दिनांक २८.१.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषयक्रमांक २:- मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावानुसार कार्यालयाने - केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले मा० व्यवस्थापक यांनी मागिल दिनांक २८.१.२००० रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावानुसार कार्यालयाने कार्यवाहीची माहिती दिली. सभेत ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३:- बँकेचे माहे जानेवारी २००० मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे जानेवारी २००० मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४:- बँकेचे माहे जानेवारी २०००चे ताळेबंद पत्रक व तरता जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयानुषंगाने माहिती देतांना सांगितले की, अतिरिक्त निधी कॉल डिपॉजिटमध्ये गुंतविला असल्यामुळे बँकेची तरती जींदगी विहित टक्केवारीपेक्षा ५१% जास्त दिसत असल्याचे सांगितले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे माहे जानेवारी २०००चे ताळेबंद पत्रक व तरता जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५:- बँकेचे सभासदत्व मिळण्यासाठी सहकारी संस्थाकडून आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे सभासदत्व मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्र जोडून अर्ज केलेल्या सहकारी संस्थांची तपासणी, बँकेचे तपासणी विभागामार्फत संस्थेच्या आर्थिक स्थितीची व कामकाजाची पाहणी करण्यांत आली असून ह्या संस्थांचे बचत/चालु खाते त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या बँकेचे शाखा कार्यालयांत सुरु आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील सहकारी संस्थांना बँकेचे सभासदत्व देण्याचे मान्य करण्यांत आले. असून सभासद फी

व प्रवेश फी भरण्यास पत्र देण्यांत यावे असे ठरले.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाखा |
|---|---|---|
| १. | सती अनुसया महिला औद्यो. सह. संस्था मर्या. कायेल | कायेल. |
| २. | सती अनुसया महिला सहकारी संस्था मर्या. कायेल | कायेल |
| ३. | जय अंबे ग्रामिण पतपुरवठा सह. संस्था मर्या. केळवद | केळवद |
| ४. | न्यु प्रियदर्शनी नागरी सह. पत संस्था मर्या., नागपूर | जिल्हा परिषद |
| ५. | इंडियन कॉम्पुटर सहकारी संस्था मर्या., नागपूर | गणेशपेठ |
| ६. | श्री राजलक्ष्मी शेळीपालन व व्यवसाय सह. संस्था मर्या. बोरी ता. रामटेक | रामटेक |
| ७. | प्रियदर्शनी महिला सह. संस्था मर्या., बालाजी नगर, नागपूर | हनुमान नगर |
| ८. | उषा महिला औद्यो. सहकारी संस्था मर्या. | गांधीबाग. |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६ :– मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ६(१) :– मुख्य कार्यालय येथील चिफ ऑफिसर केबीन व स्टॉफ साठी पार्टीशन, कॉम्पुटराईज टेबल व इलेक्ट्रीक फिटींग व फर्निशिंग कामाचे एस्टीमेट बाबत विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ६(१) :– मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत संगणकीकरण करावयाचे असल्याने संगणक ठेवण्याचे दृष्टीने मुख्य कार्यालयातील चिफ ऑफिसर व स्टॉफ यांचेकरिता कॅबिन व पार्टीशन, टेबल, इलेक्ट्रीक फिटींगसह रॅक इत्यादि कामे कर्ज विभागांत करवून घेणेकरिता बँकेचे पॅनेलवरील श्री चिचमलातपूरे, आर्कीटेक्ट यांचेकडून एस्टीमेट मागविण्यांत आले आहे. त्यांनी रुपये ११४७७३५.१६ चे एस्टीमेट सादर केले आहे. तसेच कर्ज विभागाप्रमाणेच लेखा विभागांत कामे करवून घेणे करिता बँकेचे पॅनेलवरील श्री चिचघरे आर्कीटेक्ट यांचेकडून एस्टीमेट मागविण्यांत आले आहे त्यांनी रुपये १६६७८८८.०० चे एस्टीमेट सादर केले आहे. प्रशासन विभागांत वरील कामाव्यतिरिक्त स्टेशनरी सेक्शन करिता पार्टीशन करावयाचे आहे. प्रशासन विभागातील पूर्ण कामाचे एस्टीमेट मागविल्यानुसार श्री. चिचघरे, आर्कीटेक्ट यांनी रुपये १७६९३४७.०० चे एस्टीमेट सादर केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या तिन्ही विभागाकरिता

कॅबिन व स्टॉक पार्टीशन करवून घेण्याकरिता सादर केलेले एस्टीमेट मान्य करण्यांत येत असून बांधकामाकरिता निविदा मागविण्यांत याव्या, असे ठरले.

| | कर्ज विभाग श्री चिंचमलातपुरे आर्किटेक्ट | लेखा विभाग श्री चिंचघरे आर्किटेक्ट | प्रशासन विभाग श्री चिंचघरे आर्किटेक्ट |
|---|---|---|---|
| १. एकूण कामाचे एस्टीमेट | ११०९४०८.०५ | १५८४६१३.०० | १६८१०९६.०० |
| २ ५% आर्किटेक्ट फी | ४४०४५.१६ | ७९२३४.०० | ८४०४०.०० |
| ३. ५% आर्किटेक्ट फी वरील सर्विस चार्ज. (टॅक्स) | २२०२.२५ | ३९६०.०० | ४२००.०० |
| | ११४८०८३५.१६ | १६६७८८८.०० | १७६९३८६.०० |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६(२) :- शाखा पेठ व कायेल येथील फर्निचर व इमारत दुरुस्ती आणि शाखाधापेवाडा करिता जागा खरेदीबाबत विचार करून निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ६ (२)(अ) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, शाखा पेठ येथील काउंटर, कॅश केबिन, शाखा व्यवस्थापक टेबल इत्यादि फर्निचरची किरकोळ दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक असल्याने मे. दत्तात्रय वुड वर्क, नागपूर यांचे कडून एस्टीमेट मागविल्यानुसार त्यांनी रुपये १०६६०/- चे एस्टीमेट सादर केले आहे. मे. दत्तात्रय वुड वर्क, नागपूर यांचेशी प्रत्यक्ष चर्चा केल्यानंतर सदर फर्निचर दुरुस्तीची कामे रुपये ९०००/- मध्ये करून देण्याचे मान्य केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन शाखा पेठ येथील फर्निचरचे किरकोळ दुरुस्तीची कामे करुन घेणे अत्यंत आवश्यक असल्याने मे० दत्तात्रय वुड वर्क, नागपूर यांचेकडून रुपये ९०००/- मध्ये करवून घेण्यास मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

६(२)(ब) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले, कायेल शाखेची इमारत स्वमालकीची आहे. ती इमारत अंदाजे २०-२२ वर्ष जुनी असून त्या इमारतीची दुरुस्ती करणे

आवश्यक झाले आहे. याशिवाय शाखेतील कॉंक्रिट, स्ट्राँगरुम, कंपाऊंडवाल, जिन्यावरील पॅराफीट वॉल, रंगरंगोटी व पेंटिंग इत्यादि दुरुस्तीचे कामे करावयाची आहेत. याकरिता श्री. चिंचघरे, आर्किटेक्ट (बँकेचे पॅनेलवरील) यांचेकडून मागविलेले एस्टीमेंट जास्त वाटत असल्यामुळे बँकेवरील आर्किटेक्ट, श्री चिंचमलातपुरे यांचे कडून एस्टीमेट मागविण्यांत आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन काटोल शाखेच्या इमारतीची व फर्निचरची तुजबी स्वरुपाची दुरुस्ती करुन घ्यावी. व तेथील क्वार्टर शिपाई राहण्याकरिता मोकळे करुन घ्यावे असे मान्य करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

६(२)(क) :- मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, धापेवाडा शाखेकरिता स्वमालकीची इमारत असण्याचे दृष्टीने धापेवाडा येथील आबादीमधील अंदाजे ३००० चौ. फुट जागा उपलब्ध करुन घेण्याचे दृष्टीने तालुक्याचे तहसिलदार यांचेशी पत्रव्यवहार सुरु आहे. तालुक्याचे तहसिलदार यांनी शासकीय दरानुसार सदर जागा उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन धापेवाडा शाखा इमारतीकरिता धापेवाडा येथील आबादीमधील जागा शासकीय दरानुसार उपलब्ध करुन देण्याबाबतचे पत्र प्राप्त झाल्यानंतर सदर जागा घेण्यांत यावी. सदर जागा खरेदीबाबत अटी व शर्ती बाबत निर्णय घेण्याचे अधिकार माननीय अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६(३) :- बँकेचे वकिलांचे पॅनेलवर नियुक्तीसाठी आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ६(३) :- मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, वैयक्तिक, व्यावसायिक कर्ज खाजगी कंपनीकरिता कर्ज, रोड ट्रान्सपोर्ट अंतर्गत कर्ज, तसेच इतर निरनिराळ्या कर्ज योजना बँकेतर्फे राबविण्यांत येत आहे. कर्ज घेण्यासाठी तारणांत दिलेल्या मालमत्तेच्या सर्च तसेच कर्ज मंजूर झाल्यानंतर सदर मालमत्तेवर बोजा निर्माण करुन ती मालमत्ता बँकेला तारणांत घेण्याचे काम करुन घेण्याकरिता सध्या एकच वकील श्री मदन सेनाड काम करीत आहे. कर्ज प्रकरणाची आवक लक्षांत घेता ठराविक मुदतीच्या आंत विनाविलंब बँक कर्जापोटी तारणांत दिलेल्या मालमत्तेचा सर्च व रजिस्टर्ड तारण करुन घेण्यासाठी बँकेच्या पॅनेलवर आणखी एका वकिलाची नियुक्ती करणे जरुरीचे आहे. श्री. एस. जी. जगताप यांचा बँकेचे पॅनेलवर नियुक्तीसाठी

अर्ज आलेला आहे. त्यांनी असलेल्या कामाच्या अनुभवाची, त्यांचे कार्यालय मुंबई व नागपूर येथे दोन्ही ठिकाणी असल्याची माहिती दिली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेत वकिलांचे पॅनेलवर श्री एस.जी. जगताप यांची नियुक्ती करण्यांत यावी असे ठरले. त्यांचे कामाबाबत शर्ती व अटी बाबत निर्णय घेण्याचे अधिकार माननीय अध्यक्ष यांना देण्यांत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर मा० अध्यक्ष यांनी ठेवी गोळा करण्याचे उद्देशाने स्वावलंबीनगर येथे नविन शाखा उघडणे करिता इमारत शोधण्याचे काम सुरु असल्याचे सांगितले असतां मा० ब.भा. तायवाडे यांनी सोमलवाडा भागांत आपल्या बँकेची शाखा उघडण्यांत यावी. त्यामुळे ठेवी गोळा करण्याचा उद्देश साध्य तर होईलच तथापि स्वावलंबीनगर व सोमलवाडा भागांत शाखा उघडल्यामुळे धंतोली शाखेवरील वर्क लोड सुद्धा कमी होईल असे सांगितले. एक विस्तार कक्ष नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे उघडण्यांत यावे. याकरिता नागपूर विद्यापीठ नागपूर यांना नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे बँकेचे विस्तार कक्ष उघडणेबाबत परवानगी मिळावी म्हणून विनंती करण्यांत यावी, असे मा० श्री. तायवाडे यांनी सुचना केली.

मा. श्री र.गो. बंग, संचालक यांनी बँकेने कोंढाळी येथे खरेदी केलेल्या प्लॉटवर बँकेची इमारत बांधण्याचे दृष्टीने भूमिपूजनाचा कार्यक्रम घेण्यात यावा अशी मा० अध्यक्ष यांना विनंती केली.

मा० संचालकांनी केलेल्या सुचनावर विचार करुन त्यावर मा० अध्यक्ष यांनी कार्यवाही केली जाईल असे सांगितले. तसेच त्यांनी मोहपा शाखेची, कन्हान शाखेतील फर्निचर काऊंटरची तुरळी स्वरुपाची दुरुस्ती करुन घेण्यांत यावी असे सांगितले, तसेच शाखा हिंगणा येथील इमारतीमध्ये वरच्या माळयावर असलेल्या रुममध्ये संचालकांना थांबण्याकरिता फोन पॉईंट, फॅन, खुर्च्या इत्यादि फर्निशिंगची व्यवस्था करुन देण्यात यावी. आणि कोंढाळी शाखा इमारत बांधणेकरिता भूमिपुजनाचा कार्यक्रम दिनांक १ मार्च २००० रोजी घेण्यांत यावा असे सांगितले.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून माननीय अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

प्रभारी व्यवस्थापक

अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या; नागपूर.

बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा शनिवार दि० २५.३.२००० रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष मा० सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

– उपस्थित –

१. मा. श्री. सुनील केदार — अध्यक्ष
२. मा० सौ० आशाताई महाजन — उपाध्यक्षा
3. मा. श्री. भा. चं. सहाणे — सदस्य
४ मा. श्री. शा. ग. घवड — "
५. मा. श्री. ब. भा. तायवाडे — "
६. मा. श्री. ग. के. शातीर — "
७. मा. श्री. चं. लु. समर्थ — "
८. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर — "
९. मा. श्री. ए० एन० चौधरी — सरव्यवस्थापक.

– अनुपस्थित –

१. मा. श्री. र. गो. बंग — सदस्य
२. मा. श्री. व. भा. वांढे — "
3. मा. सौ० कु. ग. किंमतकर — सदस्या
४. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
५. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सह० संस्था (बँक) नागपूर.
६. मा. विभागिय अधिकारी, म. रा. सह० बँक लिमी; विभागीय कार्यालय नागपूर.

सभेला सुरुवात करण्यापूर्वी मा. श्री. र. गो. बंग सदस्य मा. श्री. व. भा. वांढे सदस्य व मा० सौ० कु. ग. किंमतकर, सदस्या यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

सभेला उपस्थितांचे स्वागत करुन विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक २६.२.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा करतांना मा० श्री० चं. लु. समर्थ म्हणाले की, मागील

सभेतील ठराव क्र.३ मध्ये लिहिण्यांत आलेला ठराव पूर्णपणे बदलून त्या ऐवजी लिहावयाच्या ठरावाबाबत सांगितले व या ठरावांत वकीलांचे पॅनेलवर नियुक्तीसाठी आलेल्या अर्जानुसार श्री. सोनप यांचे नांव घेण्यांत यावे अशी सुचना करुन दुरुस्ती घेण्याबाबत सुचविले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा. श्री.त्र्यं. लु. समर्थ यांनी सुचविल्याप्रमाणे ठराव क्रमांक ६(३) मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती घेऊन लिहिण्यांत यावा असे ठरले. व मागील दिनांक २६-२-२००० चे सभेचे प्रोसिडिंग सर्वानुमते कायम करण्यांत आले.

" मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा होऊन बँकेचे वकिलांचे पॅनेलवर कामाचा व्याप पाहतां नियुक्तीसाठी आलेल्या अर्जावर विचार विनिमय करुन श्री. एस. जी. जगताप, श्री सोनप यांना नियुक्ती देण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ :– मागील सभेत पारीत झालेल्या ठरावानुसार कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :– मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सांगितले की, ठराव क्रमांक ६ (२) बाबत करावयाची कोंडुर दुरुस्तीची कामे स्थानिक ग्रामपंचायतचे सरपंचाशी चर्चा झाली असून अधिकची जागा उपलब्ध झाल्यावर करण्यांत येईल अशी दुरुस्ती घेण्यांत यावी. उर्वरित ठरावाचे बाबतीत मागील सभेत पारीत झालेल्या ठरावानुसार कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मा. सरव्यवस्थापक यांनी योग्यवेळी माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ३ :– बँकेचे माहे फेब्रुवारी २००० मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :– मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे फेब्रुवारी २००० मध्ये झालेल्या व्यवस्थापन खर्चास मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४ :– बँकेचे माहे फेब्रुवारी २००० चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेच्या तरला जिंदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे माहे फेब्रुवारी २०००चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेच्या तरत्या जिंदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५:- बँकेचे कळमना शाखेचे महानगरपालीका करांत सुट मिळणेकरिता मा० निगम आयुक्त, नागपूर यांचेकडे रिकाम्या जागेवर लावण्यांत आलेल्या टॅक्समध्ये व्हॅकन्सी रिलिफ मिळणेकरिता केलेल्या मागणीबाबत...

ठराव क्रमांक ५:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेनी कळमना यार्डमधील ५४० चौरस मिटरची जागा ३० वर्षांचे लिजवर १९८८ साली शाखा कार्यालयासाठी घेतली आहे. ह्या खाली जागेवर १९८८ पासून ३१ मार्च १९९९ पर्यंत रू० १०८७३७/- व १९९९-२००० या वर्षाचा रू. ५७६७/- असा एकूण टॅक्स रुपये ११४५०४/- ची मागणी आली असतां मा० अतिरिक्त निगम आयुक्त नागपूर महानगरपालीका नागपूर यांनी सांगीतल्याप्रमाणे दिनांक १.१.८८ ते ३१.३.९९ पर्यंतचा संपूर्ण टॅक्स भरण्यांत आला असून त्यांतील मालमत्ता करावर ३४ रक्कम व्हॅकन्सी रिलिफ म्हणून रुपये ३८२६६/- मिळणार आहे. ह्या व्हॅकन्सी रिलिफ रु. ३८२६६/- ची सुट पुढील बीलांत मिळू शकेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कळमना यार्डमधील शाखा कार्यालयाकरिता घेतलेल्या जागेचे टॅक्सवरील व्हॅकन्सी रिलिफ बाबत माहितीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ६:- दिनांक १.४.२००० रोजी मा० मुख्यमंत्री यांचे कार्यक्रमासाठी करावयाचे खर्चास परवानगी देणेबाबत...

ठराव क्रमांक ६:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी महाल येथील जुनी इमारत पाडून नविन इमारत बांधणेकरिता परवानगी दिलेली आहे. या प्रमाणे महाल येथील स्वमालकीचे जागेवर संकुल बांधावयाचे असल्याने दिनांक १-४-२००० रोजी मा. ना. श्री. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे शुभ हस्ते संकुलाचे भूमी पुजनाचा कार्यक्रम आहे. कार्यक्रमाकरिता मंडप तयार करणे, हारगुच्छे आणणे, डेकोरेशन करणे, डायस करणे, गेट तयार करणे, साऊंड सर्विसची व्यवस्था करणे, बहापणी पत्रिका

छापणे, पाण्याची व्यवस्था, फोटो, कार्यक्रमाची जाहिरात इत्यादि आवश्यक व्यवस्था करावी लागेल. सदर कार्यक्रमाकरिता करून घ्यायच्या व्यवस्थेसाठी अपेक्षित मान्यतेवर बाजवी खर्च करण्यास परवानगी देण्यांत येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७:- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ७(१):- शाखा कार्याल येथील शाखेतील दुरुस्तीबाबत विचार करणे व निर्णय घेणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७(१):- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, कायले शाखा इमारतीची कंपौंडवाल, काउंटर, पॅराफिरवाल स्ट्रॉगरुम, स्ट्रॉगरुम डोअर शिफ्टींग, टॉयलेट दुरुस्ती, सेप्टी टँक, मॅनेजर क्वार्टर दुरुस्ती व पाण्याचे सम्प इत्यादि किरकोळ दुरुस्तीचे काम करण्याकरिता रुपये ३९६१९५.४९ चे श्री चिंचमलातपूरे आर्कीटेक्ट यांनी खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री. चिंचमलातपूरे यांनी कायेल शाखेतील किरकोळ दुरुस्तीचे कामाकरिता खालील प्रमाणे सादर केलेले रु.३९६१९५.४९ चे खर्चाचे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येत असून खर्चाचे अंदाज पत्रकानुसार सदर कामाचे कोटेशन बोलाविण्यात यावे असे ठरले.

| | |
|---|---|
| एकूण कामाचे एस्टीमेट | रुपये ३८०२२६.०० |
| ४% आर्कीटेक्ट फी | रुपये १५२०९.०४ |
| ५% (आर्कीटेक्ट फी वरील) सर्विस चार्ज रुपये | ७६०.४५ |
| | रुपये ३९६१९५.४९ |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७(२):- मुख्य कार्यालय व शाखा कार्यालयांना लागणाऱ्या स्टेशनरी खरेदी करिता मंजूरी देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७(२):- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेला डुप्लीकेटींग पेपर, मुदत ठेव फॉरर्मिक कव्हर, करंट डे बुक, मुदत ठेव रसिद बुक, सेव्हींग लेजर, मेन कॅश बुक, लॉग बुक इत्यादिची असलेली आवश्यकता असल्याने वरील आयटमची पुर्तता करणेसाठी बोलाविण्यात आलेल्या ७ स्टेशनर्सचे कोटेशन पैकी

२ स्टेशनर्सचे (आयटमनुसार दर) सर्वात कमी दराचे कोटेशन आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेसाठी लागणारी आवश्यक स्टेशनरी सर्वात कमी दराने पुरविणाऱ्या खालील स्टेशनर्सकडून त्यांचे नांवासमोर दर्शविलेली स्टेशनरी खरेदी करण्यांत यावी, असे ठरले.

| अ.क्र. | विक्रेत्याचे नांव | स्टेशनरी | किंमत |
|---|---|---|---|
| १. | स्वस्तिक स्टेशनर्स | डुप्लीकेटींग पेपर ५००रीम | रु.३६७४८.०० |
| | | मुदत ठेव प्लॅस्टीक कव्हर ३०००नग | रु. ८९००.०० |
| | | करंट डे बुक १२०० नग | रु.१५४९२.०० |
| | | मुदत ठेव रशिद बुके १५० नग | रु. ७०२८.५० |
| | | (अ) | रु. ६६२३९.५० |
| २. | गुरुकृपा स्टेशनर्स | सेव्हिंग लेजर्स ३०० नग | रु २८,८००.०० |
| | | मेन कॅश बुक | रु ८०७५.०० |
| | | लॉग बुक | रु. ९७५.०० |
| | | (ब) | रु. ३७८५०.०० |

(अ) + (ब) = बेरीज रु. १०६०७९.५०

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७(३):- बँकेच्या पॅनेलवर कर्ज मंजूरीच्या दृष्टीने तसेच बँकेला प्राप्त झालेल्या अवार्डनुसार वसुली करण्यासाठी प्लँट अँड मशिनरीजचे व्हॅलुएशन करण्याकरिता व्हॅल्युअर्सचे पॅनेल तयार करणेबाबत...

ठराव क्रमांक ७(३) – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या विविध कर्ज योजने अंतर्गत संस्थांच्या व वैयक्तीक कर्जदारांच्या मालकीच्या प्लँट, मशिनरीजचे व्हॅल्युएशन करुन घेणेकरिता बँकेत रजिस्टर्ड व्हॅल्युअर्सचे पॅनेल तयार करायचे आहे. या पॅनेलवर नियुक्ती मिळणेकरिता श्री. डी० के० खेडकर, श्री. व्ही० एन० तालीप्रैय्या व व्हॅल्युअर्स कोलॅबरेटीव्ह प्रा० लिमि० नागपूर यांचेकडून अर्ज आलेले आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेत रजिस्टर्ड व्हॅल्युअर्सचे पॅनेलवर नियुक्ती मिळणेसाठी रजिस्टर्ड व्हॅल्युअर्स/इंजिनिअर्स कडून प्राप्त झालेल्या अर्जावर विचार होऊन त्यांचे कामाच्या अनुभव विचारांत घेता खालील व्हॅल्युअर्स/इंजिनिअर्स यांना बँकेचे रजिस्टर्ड व्हॅल्युअर्स पॅनेलवर घेण्यात यावे, असे ठरले.

अ.क्र. नांव

(१) श्री. डि. के. खेडकर, नागपूर
(२) श्री. व्ही. एन. तालिमैय्या, नागपूर
(३) केल्युअर्स कोलॅबरेटिव्ह, प्रा. लि. नागपूर.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७(४) - बँकेचे शाखा कार्यालयातील व मुख्य कार्यालयातील कुलर्स सर्व्हिसींग व दुरुस्ती करणेबाबत विचार करणे.
ठराव क्रमांक ७(४) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मागिल वर्षापर्यंत देण्यात आलेली शाखां मधील व मुख्य कार्यालयातील कुलर्सची सर्व्हिसींग व दुरुस्ती करुन घ्यायची आहे. या कामाकरिता कोटेशन बोलाविण्यांत आली असून तीन कोटेशन प्राप्त झाली आहेत. त्यापैकी उरकुडे इलेक्ट्रीकल वर्क्स, नागपूर यांचे कोटेशन सर्वात कमी दराचे आहे.
विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे शाखांतील व मुख्य कार्यालयातील कुलर्स उरकुडे इलेक्ट्रीकल वर्क्स, नागपूर यांचेकडून सर्व्हिसींग व दुरुस्ती करुन घ्यावी असे ठरले.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७(५) :- मुख्य कार्यालयातील लेखा विभागांत चिफ ऑफीसर केबीन, विभाग प्रमुखाचे टेबल व कर्मचाऱ्यांकरिता कॉम्पुटर टेबल्स इ. कामाच्या टेंडरला मंजूरी देणेबाबत विचार करणे.
ठराव क्रमांक ७(५) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, लेखा विभागांत संगणकीकरण करणे साठी फर्निचर वर्क्स करणेकरिता श्री. चिंचघरे यांनी तयार केलेल्या एस्टीमेटनुसार "नवभारत व लोकसत्ता" दैनिकांत जाहिरात देऊन कंत्राटदाराकडून टेंडर मागविण्यांत आले. ५ कंत्राटदाराकडून खालील प्रमाणे टेंडर प्राप्त झाली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. फार्मस, नागपूर | रुपये ११३०९६६=७५ |
| २. | मे. सौदामिनी बिल्डर्स | रुपये १२२६१२५=०० |
| ३. | धनराज अँड बजाज अँड कंपनी | रुपये १२६६२६४=०० |
| ४. | कृष्णा गंगा कंट्रक्शन्स | रुपये १३९९६६०.०० |
| ५ | आकृती फर्निचर | रुपये १४६३८५२=०० |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन वरीलप्रमाणे टेंडर भरणाऱ्या कंत्राटदारांना चर्चेसाठी बोलवावे व त्यांचेशी निगोशियेशन करावे. टेंडर

कंत्राटदाराशी निगोशियशन करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यात येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ८(६) :- मुख्य कार्यालयातील कर्ज विभाग व वसुली विभागात ३ चिफ ऑफिसर्स केबीन, सेक्शन हेड केबीन व स्टाफ टेबल्स कॉम्प्युटर व्यवस्थेसह प्राप्त झालेल्या टेंडरला मंजूरी देणेबाबत..

ठराव क्रमांक ८(६) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे मुख्य कार्यालयातील कर्ज विभाग व वसुली विभागातील ३ मुख्याधिकारी यांचेकरिता केबीन व स्टाफकरिता फर्निचर वर्क्स करून घेणेकरिता श्री. चिंचमलातपूरे यांनी तयार केलेल्या खर्चाचे अंदाजपत्रकानुसार दैनिक "जनवाद" मध्ये जाहिरात देऊन टेंडर मागविण्यात आले. ५ कंत्राटदाराकडून खालील प्रमाणे टेंडर आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे० क्रिष्णागंगा कंसलटंट | रुपये ८७८९६५.०० |
| २. | मे० सौदामिनी बिल्डर्स | रुपये १०१९९५६.०० |
| ३. | मे० धनराज बजाज ॲंड कंपनी | रुपये १०८५०८०.०० |
| ४. | फार्मसि, नागपूर | रुपये ९९२८००८.०० |
| ५. | आकृती फर्निचर | रुपये १२५६५५६.०० |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन वरील प्रमाणे टेंडर भरणाऱ्या कंत्राटदारांना निगोशियशनकरिता चर्चेसाठी बोलवावे व या कंत्राटदाराशी निगोशियशन करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यात येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ८(७) - मा० अध्यक्ष यांचे मुंबई येथील प्रवासाचे रुपये ८५४०१/- चे प्रवास भत्ता बीलास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ८(७) :- मा० मुख्यमंत्री यांनी विदर्भातील जिल्हा बँकेच्या अध्यक्षांची मार्च २००० मध्ये सभा बोलाविली. त्या सभेस हजर राहण्यासाठी मुंबई येथे गेल्याने मा० अध्यक्ष श्री सुनिल केदार यांनी सादर केलेले रुपये ८५४०१/- चे प्रवास भत्ता बीलास मंजूरी देण्यात आली आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७(८) - झिंगाबाई टाकळी शाखेकरिता कार्यालयाच्या व कामाच्या वेळा ठरविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७(८) - मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, बँकेची ६८वी शाखा झिंगाबाई टाकळी येथे सुरू होत आहे. बँकेची नविन शाखा सुरू करण्याचे दृष्टीने तेथील व्यवस्था पूर्ण झालेली आहे. बँकेच्या ग्राहकांना तत्पर व जास्तीत जास्त सेवा उपलब्ध करून देणेकरिता ही शाखा सुरुवातीपासूनच संगणिकृत (Computerised) करायची आहे. तसेच शाखेच्या वेळा सकाळी व दुपारी अशा दोन पाळीमध्ये ठेवायच्या आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन झिंगाबाई टाकळी या नविन शाखेच्या कार्यालयाच्या/कामकाजाच्या वेळा खालीलप्रमाणे ठेवण्यात याव्या असे ठरले.

| अ.क्र. | दिवस | पहिली पाळी | दुसरी पाळी |
|---|---|---|---|
| १. | सोमवार ते शुक्रवार | स. ९.३० ते दु. १२.३० | दु. ३.०० ते रात्री ७.०० |
| २. | शनिवार | स० ९.३० ते दु. २.०० | — |

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. नागपूर.